वर्ष : सतरावे
जून २०२५
अंक : सहावा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

## विषयांचं वैविध्य । आशयाची समृद्धी

## ७३

वर्धापनदिन विशेष

राजहंस प्रकाशन

साहित्याची अक्षरगंगा
झुळझुळ वाहे नित्य निरंतर
परंपरा अन् नवतेसह
हे जीवन होई सुफल, शुभंकर

भारतीय कलेतिहासाचे साहित्यिक जतन - संवर्धन करण्याचा ध्यास घेतलेल्या
सुहास बहुळकरांच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रकथी शैलीतले हे पुस्तक म्हणजे
इतिहास, चित्रकला आणि शिल्पकला या तिन्ही क्षेत्रांतील
अनेक मान्यवरांच्या अतुलनीय कार्यकर्तृत्वाला दिलेली मानवंदना !
अनेक चित्रकार, शिल्पकार यांनी शिवचरित्रावर आधारित
केलेल्या कलाविष्कारामागील कथा आणि व्यथांचे हे
अनोखे वाचनीय संकलन संग्रही असायलाच हवे ...



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक सहावा
१५ जून २०२५
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- श्रद्धांजली - *डॉ. जयंत नारळीकर*
  - डॉ. सदानंद बोरसे / ८
  *माधव वझे* - अभिराम भडकमकर / १२
  *अरुणा देशपांडे* / १४
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  - *आबली* - जगदीश पवार / १५
- वसा अक्षर चळवळीचा
  - *'बुक लव्हर्स क्लब'चे पाऊल पडते पुढे*
  - किशोर काकडे / १७
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / २३
- असे जन्मले पुस्तक!
  *देहभान* - निरंजन मेढेकर / २५
- आठवणींचा पारिजात
  - *निरंकुशाचा मुक्तछंद*
  - मानसी मागीकर / २९
- राजहंसी मोहोर - ऑडिओ पॉडकास्ट / ३२
- क... कवितेचा - राजीवलोचन पुंडलीक / ४३
- उद्गार -
  *मेड इन चायना* - रविप्रकाश कुलकर्णी / ४५
- राजहंसी पार / ४८
- वाचकांच्या मनातलं... / ५२

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके

*अमृता सुभाष आपल्या लेखनाविषयी म्हणतात, ''माझे बरेचसे लेख हे मी मलाच 'शोधणं' होतं. 'मी खरंच कोण आहे?', 'कोऽहम्?', 'माझं या भूतलावरचं मुख्य कार्य काय?' मला अभिनय आवडतो, गाणं आवडतं, लिहायला आवडतं, नृत्य आवडतं. आजवरच्या आयुष्यात मी अभिनयकलेला सर्वांत जास्त जोपासलं. मला सगळे अभिनेत्री म्हणत असले, तरी मी फक्त तेवढीच नाही हे मला माहितीये. त्याच्या आसपासचं, पलीकडचं जे खूप काही आहे माझ्यात; ते धडका मारत राहतं आतून... ते काय आहे, ते शोधण्याची सुरुवात माझ्या लिखाणानं केली आणि 'मी कोण आहे' या प्रश्नाची शब्दातीत उत्तरं शोधायला मला शब्दांनीच मदत केली, असं आता वाटतं.''*

संग्रही हवेच असे हे पुस्तक -



### एक उलट एक सुलट : भाग २

अमृता सुभाष

किंमत : ₹ २६०/-

(ट.ख. ₹ ५०)

*श्री. नितीनजी गडकरी या पुस्तकाविषयी म्हणतात, ''मला संघ जसा समजला, तसा या पुस्तकात मी माझ्या क्षमतेनुसार मांडलेला आहे. मानवतेविषयी कळकळ, कारुण्य, समता, समरसता ही संघाची मूळ शिकवण आणि आपल्या राष्ट्राप्रति असलेली कर्तव्यबुद्धी यांचा मला कधीही विसर पडला नाही. माझ्या असे असण्याचे संपूर्ण श्रेय संघ-संस्कारांचे आहे असे मी मानतो. त्यामुळेच हे पुस्तक विविध कार्यक्षेत्रांविषयी किंवा एकूणच संघप्रणालीविषयी संघाचे अधिकृत मत मांडत नसून एका स्वयंसेवकाने आपल्या आकलनाच्या गवाक्षातून अनंत 'संघाकाशा'चा वेध घेण्याचा हा प्रयत्न आहे.''*

२०२५मध्ये संघ शंभरीचा होत असताना एका राष्ट्रसेवकाने दिलेली ही दूरदृष्टी आपणही वाचायला हवी...



### संघातील मानवी व्यवस्थापन
एका स्वयंसेवकाच्या नजरेतून

नितीन गडकरी

किंमत : ₹ २५०/-

(ट.ख. ₹ ५०)

# संपादकीय

## सावध ऐका...

*आज, १ जून २०२५ रोजी, [प्रकाशन संस्थेचे नाव] साठी एक महत्त्वाचा प्रसंग आहे कारण आम्ही आमचा ७३ वा वर्धापनदिन साजरा करत आहोत. ७३ वर्षांपूर्वी, १९५२ मध्ये याच दिवशी, मराठी साहित्य आणि मनांना समृद्ध करण्याच्या दृष्टीने एक बीज पेरले गेले होते. त्या लहानशा सुरुवातीपासून, आम्ही आता एक प्रकाशन संस्था म्हणून बहरलो आहोत, जी आत्मचरित्रे, चरित्रे, लोकप्रिय विज्ञान, कला आणि ललित कथा या क्षेत्रातील तिच्या विविध आणि प्रभावशाली योगदानासाठी ओळखली जाते.*

***जीवन आणि शिक्षणाचा वारसा***

*मानवी अनुभवाच्या आकर्षक कथा समोर आणण्याच्या वचनबद्धतेने आमचा प्रवास सुरू झाला. आत्मचरित्रे आणि चरित्रे यांच्या माध्यमातून, आम्ही अशा व्यक्तींच्या विलक्षण जीवनाची कहाणी सांगण्याचे भाग्य अनुभवले आहे ज्यांनी आपल्या जगाला आकार दिला, पिढ्यांना प्रेरणा दिली आणि समाजावर अमिट छाप सोडली. प्रत्येक कथा, काळजीपूर्वक निवडलेली, विजय, संघर्ष आणि मानवी आत्म्याच्या अदम्य भावनांचे दर्शन घडवते.*

*वैयक्तिक गाथांच्या पलीकडे जाऊन, ज्ञानाचा प्रसार सुलभ आणि आकर्षक असावा या विश्वासाने आम्ही लोकप्रिय विज्ञान क्षेत्रात पदार्पण केले. आम्ही क्लिष्ट वैज्ञानिक संकल्पना सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यामुळे त्या सर्व वयोगटातील वाचकांसाठी समजण्यास सोप्या आणि रोमांचक बनल्या आहेत. आमच्या विज्ञान पुस्तकांनी जिज्ञासा वाढवली आहे, गंभीर विचारांना प्रोत्साहन दिले आहे आणि विश्वाच्या चमत्कारांबद्दल अधिक सखोल कौतुक निर्माण केले आहे.*

***निर्मितीची कला आणि कल्पनाशक्तीची शक्ती***

*कला क्षेत्रातील आमचे समर्पण तितकेच अटूट राहिले आहे. आमच्या कला-संबंधित पुस्तकांनी दृश्य आणि सादरकलांच्या ज्वलंत पटलाचा उत्सव साजरा केला आहे, विविध कला प्रकार, कलाकार आणि त्यांच्या निर्मिती प्रक्रियेबद्दल अंतर्दृष्टी प्रदान केली आहे. आमचा विश्वास आहे की कला जीवनाला समृद्ध करते, कल्पनाशक्तीला उत्तेजित करते आणि संस्कृतीचा आत्मा प्रतिबिंबित करते आणि तिच्या कौतुकाला*

*चालना देण्यात भूमिका बजावल्याचा आम्हाला अभिमान आहे.*

*आणि मग येते ललित कथा – कल्पनाशक्तीची अथांगता. रोमांचक थ्रिलरपासून ते हृदयस्पर्शी कथांपर्यंत, विचारप्रवर्तक सामाजिक टिप्पणीपासून ते काल्पनिक प्रवासांपर्यंत, आमच्या ललित कथांच्या शीर्षकांनी वाचकांना नवीन जगामध्ये नेले आहे, दृष्टिकोन बदलले आहेत आणि भावनांचा स्पेक्ट्रम जागृत केला आहे. आम्ही उदयोन्मुख लेखकांसाठी आणि स्थापित लेखकांसाठी एक समान व्यासपीठ राहिलो आहोत, ज्यामुळे मराठीत एक समृद्ध आणि गतिशील साहित्यिक परिदृश्य तयार झाले आहे.*

***भविष्याकडे वाटचाल: कथा आणि शोधाच्या भविष्याकडे***

*प्रकाशन क्षेत्रातील ७३ वर्षांच्या वाटचालीकडे वळून पाहताना, आम्ही कृतज्ञतेने भरून गेलो आहोत – आमच्या लेखकांबद्दल त्यांच्या विश्वासासाठी आणि त्यांच्या अविश्वसनीय कार्याबद्दल, आमच्या वाचकांबद्दल त्यांच्या अखंड समर्थनाबद्दल आणि आमच्या समर्पित चमूबद्दल, भूतकाळातील आणि वर्तमानातील, ज्यांची उत्कटता आणि कठोर परिश्रम आमच्या यशाचा आधारस्तंभ आहेत.*

*प्रकाशन जग सतत विकसित होत आहे आणि आम्ही आमच्या मूळ मूल्यांना खरे राहून या बदलांना स्वीकारण्यास वचनबद्ध आहोत. आम्ही आमच्या वाचकांशी जोडल्या जाणाऱ्या आकर्षक कथा, महत्त्वपूर्ण कल्पना आणि कलात्मक अभिव्यक्ती शोधणे सुरू ठेवू. पुस्तकांच्या सामर्थ्याने लाखो लोकांच्या जीवनात माहिती, प्रेरणा, मनोरंजन आणि समृद्धी आणणे हेच आमचे ध्येय आहे.*

*ज्ञान वाटप करण्यासाठी, सर्जनशीलता वाढवण्यासाठी आणि लिखित शब्दाचा उत्सव साजरा करण्यासाठी आणखी अनेक वर्षांसाठी! आम्ही आमच्या प्रवासातील पुढील अध्यायाची आतुरतेने वाट पाहत आहोत, तुम्हाला आमच्यासोबत शोध घेण्यासाठी, शिकण्यासाठी आणि स्वप्न पाहण्यासाठी आमंत्रित करत आहोत.*

* * *

एखाद्या गोष्टीबद्दल अधिक काही जाणून घ्यायचे असेल, तर काय करावे? या प्रश्नाचे उत्तर म्हणून डॉ. जयंत नारळीकर एक महत्त्वाचे वैज्ञानिक तथ्य अगदी साध्या शब्दांत सांगायचे, 'स्वत: तपासून घ्या.' किंवा 'प्रयोग करून पहा.'

आज चोहीकडे बोलबाला असलेल्या कृत्रिम प्रज्ञेबाबत - आर्टिफिशियल इंटेलिजन्स - ए.आय.बाबत असाच एक प्रयोग करण्याचे 'राजहंस'ने ठरवले.

१ जून हा राजहंस प्रकाशनाचा वर्धापनदिन. साहजिकच जून महिन्याच्या 'राजहंस ग्रंथवेध'मध्ये तदनुषंगिक काही उल्लेख असणे अपेक्षित अन् अपरिहार्य. त्यासाठी चर्चा

चालू होती जून २०२५च्या अंकाच्या संपादकीयाची. नंतर संभाषणाच्या ओघात विषय वळला कृत्रिम प्रज्ञेकडे. माझ्या मनात एक कल्पना आली, 'या अंकाचे संपादकीय या कृत्रिम प्रज्ञेला लिहायला सांगितले तर?' नारळीकर सरांच्या सांगण्याचा आधार होताच.

कृत्रिम प्रज्ञेच्या क्षेत्रात काही काळ कार्यरत असणाऱ्या अरविंद आचार्य या माझ्या मित्राशी मी संपर्क साधला. 'Marathi Publishing House', '73rd Anniversary', 'Books - Autobiography / Biography / Popularization of Science / Art-related / Fiction / Children's literature', 'Editorial for House Magazine', 'Word Limit 300 to 400' असे मोजून 25 शब्द अरविंदने कृत्रिम प्रज्ञेला पुरवले. 'गुगल जेमिनी' आणि 'चॅट जीपीटी' (जनरेटीव्ह प्रिट्रेंड ट्रान्सफॉर्मर) या दोन 'कृत्रिम प्रज्ञावंतां'ना अरविंदने कामाला लावले. या संपादकीयाच्या सुरुवातीला तिरप्या अक्षरांत दिलेला मजकूर म्हणजे गुगल जेमिनीने साकारलेले संपादकीय. 'चॅट जीपीटी'नेही आशयदृष्ट्या समांतर वाटेल, पण वेगळ्या शब्दांमध्ये मांडलेले संपादकीय आमच्यासमोर ठेवले. या ४३३ शब्दांच्या मजकुरात आम्ही कोणताही - अगदी विरामचिन्हे अथवा परिच्छेद-रचना / वाक्यरचना असासुद्धा - बदल केलेला नाही. कृत्रिम प्रज्ञेला आम्ही पंचवीस इंग्रजी शब्द पुरवले होते. (ते शब्द मराठीतूनही पुरवता आले असते, हा शोध मला नंतर लागला.) त्यातून इंग्रजी मजकूर लिहिणे आणि त्याचा मराठी अनुवाद करणे हीही कामे कृत्रिम प्रज्ञेनेच केली आहेत.

साहित्यक्षेत्राशी संबंधित असलेल्या आणि लेखनकार्यात बऱ्यापैकी रुळलेल्या एखाद्या व्यक्तीने हे संपादकीय लिहिले आहे, असे वाटेल इतपत सफाई या मजकुरातून दिसून येते. हाताने केलेल्या पॉलीशपेक्षा मशीनने केलेले पॉलीश जास्त चमकते, तशी काही ठिकाणी या मजकुरातील सफाई थोडी जास्त झळकते. पण या लिखाणामागे जिवंत मानवी मेंदू नाही, अशी शंका कुणाच्या मनात सांगितल्याशिवाय सहसा डोकावणार नाही.

भविष्यात प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम प्रज्ञेचा शिरकाव झालेला असणार आहे. त्याच्या सुरुवातीच्या पाऊलखुणा आताच प्रकर्षाने दिसू लागल्या आहेत. विशेषत: निर्मितीच्या, सृजनाच्या विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम प्रज्ञा ही मानवी प्रज्ञेला साहाय्यक ठरणार की स्पर्धक, मदतनीस ठरणार की आव्हानवीर - अशा प्रश्नांची चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर झडू लागली आहे. स्वामित्वहक्कांपासून उपयोजनांपर्यंत, आर्थिक वा व्यावहारिक वा कायदेशीर बाबींपासून नैतिक वा मूल्याधिष्ठित बाबींपर्यंत अनेक पातळ्यांवर मानवी प्रज्ञा आणि कृत्रिम प्रज्ञा यांना पारड्यात तोलताना काय निकष असावेत, काय नियम अन् कायदेकानून लावावेत, याबद्दल वाद-संवाद सुरू झाले आहेत.

एखादी गोष्ट सफाईने 'रचणे' कृत्रिम प्रज्ञेला शक्य आहे, पण एखादी नवी गोष्ट 'सुचणे' हे मानवी प्रज्ञेचे अंगभूत सामर्थ्य कृत्रिम प्रज्ञेला साध्य होईल का? कृत्रिम प्रज्ञेच्या

विकासासाठी संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांना या प्रश्नाच्या उत्तरात विलक्षण रस आहे. कृत्रिम प्रज्ञा म्हणजे अल्लाउद्दीनच्या दिव्यातील आपल्या ताब्यात राहणारा आज्ञाधारक जिन ठरणार की निर्माणकर्त्याच्या मस्तकावर हात ठेवायला निघालेला भस्मासुर - काळाच्या पोटात दडलेल्या या प्रश्नाच्या पुसट हाका ऐकू येत आहेत.

सरतेशेवटी मला एक प्रश्न पडला.

या अंकाचे संपादकीय कृत्रिम प्रज्ञेकडून लिहून घ्यावे, ही कल्पना कृत्रिम प्रज्ञेला 'सुचली' असती का?

**डॉ. सदानंद बोरसे,** संपादक, राजहंस प्रकाशन

*(या संपादकीयातील आरंभीचा तिरप्या अक्षरांतील ४३३ शब्दांचा मजकूर 'गुगल जेमिनी'ने साकारला आहे.)*

---

॥ श्रद्धांजली ॥

*आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचे दि. २० मे, २०२५ रोजी दु:खद निधन झाले. राजहंस प्रकाशन परिवारातर्फे डॉ. जयंत नारळीकर यांना आदरांजली!*

*सैद्धान्तिक भौतिकशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र तसेच विश्वरचनाशास्त्र हे डॉ. नारळीकर यांच्या संशोधनाचे प्रमुख विषय होते. त्यांनी अनेक संशोधन प्रबंध आणि ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या खगोलीय संशोधनावर आधारित 'ताऱ्यांची जीवनगाथा', 'मायाजाल', 'नभात हसरे तारे' (डॉ. अजित केंभावी व डॉ. मंगला नारळीकर यांच्या सौजन्याने) 'अ कॉस्मिक ॲडव्हेंचर' (डॉ. मंगला नारळीकर सहलेखिका), 'आकाशाशी जडले नाते' ही त्यांची ग्रंथसंपदा राजहंस प्रकाशनाकडून प्रकाशित झाली आहे. साहित्यावर आधारित 'समग्र नारळीकर' हे पुस्तकही राजहंसकडून प्रकाशित झाले आहे.*

*राजहंस परिवार आणि डॉ. नारळीकर यांचे स्नेहशील नाते होते. डॉ. सदानंद बोरसे यांनी लिहिलेला श्रद्धांजलीपर लेख येथे प्रकाशित करत आहोत.*

## प्रिय सर, तुम्ही मराठी मनाला विश्वाचे अंगण दिले!

प्रिय सर,

तुमची तब्येत बरी नसल्याच्या बातम्या खूप दिवसांपासून कळत होत्या. आता समजलेली सर्वांत दु:खद बातमीही टांगत्या तलवारीसारखी काही काळ

लटकलेली होतीच. पण तरीही ती नकोशी वाटत होती. तुम्ही आहात, ही तुमच्या अस्तित्वाची जाणीवही खूप आधार देणारी असायची. तुमच्या सहवासात आलेल्या, न आलेल्या, तुम्हाला भेटलेल्या, न भेटलेल्या कितीकांना आज हा आधार निखळल्याची भावना झाली असणार आहे.

तुमची आणि मंगलाताईंची प्रत्यक्ष भेट होण्याआधीच तुमची सगळीकडे दुमदुमणारी कीर्ती ठाऊक होती आणि त्यामुळे भेटीचा मनावर खूप मोठा ताणही होता.

एवढे मोठे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ. 'रँग्लर' ही गणितातील सर्वोच्च पदवी मिळवणारे गणितज्ञ. आपण भेटीत त्यांच्याशी काय बोलणार? हां, ऐकण्याचे काम खूप करता येईल. कारण भेटीचे निमित्त होते डॉ. श्रीराम गीत लिहीत असलेल्या 'सृष्टिविज्ञान गाथा' या प्रस्तावित विज्ञानकोशाचे. राजहंस प्रकाशनातर्फे प्रकाशित होऊ घातलेल्या या विज्ञानकोशाच्या संपादनाची जबाबदारी तुम्ही स्वीकारावी, अशी आम्ही विनंती केली होती आणि तुम्ही मान्य केली होती. त्या संदर्भातच होणारी ही भेट. त्या पहिल्या भेटीतच तुमच्या मोठेपणाच्या, ज्ञानाच्या दडपणाखाली आम्ही गुदमरू नये, याची जाणीवपूर्वक काळजी तुम्ही घेत होतात.

दंतकथा वा मिथके वाटतील, अशा तुमच्याबद्दलच्या किस्से-कहाण्या लहानपणापासून ऐकल्या होत्या. देवदर्शन जितके दुर्लभ, तितकेच तुम्हाला प्रत्यक्ष भेटणे अशक्य - अशीही भावना मनात वागवलेली. पण तो योग जुळून आला राजहंस प्रकाशनातर्फे राबवल्या जाणाऱ्या एका वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्पाने.

तुम्ही आणि डॉ. श्रीराम गीत यांनी या कोशाचा आराखडा तयार केलात. त्या वेळी एका बाजूला सर्वांगीण विचार करणारा तुमचा व्यासंग,



बिनचूकपणाबद्दलचा आग्रह, सामान्य वाचकाच्या आकलनकक्षेत विषय येण्यासाठी सुबोध भाषेची सूचना आमच्यापर्यंत तुम्ही पोहोचवत होतातच. पण या साऱ्याचा ताण वाटू नये अशा उद्देशाने आपल्या नर्मविनोदाने, मार्मिक टिपण्यांनी सारे वातावरणही हलकेफुलके ठेवत होतात.

ज्या विश्वाचा वेध तुम्ही आपल्या संशोधनातून सातत्याने घेत राहिलात, त्याच विश्वातील अनेक चीजवस्तू या कोशाच्या अंगणात मांडून तुम्ही जणू 'विश्वाचे अंगण' या कोशातून मराठी वाचकाला आंदण दिलेत. डॉ. श्रीराम गीत यांनी एकहाती लिहिलेल्या आणि सुप्रसिद्ध चित्रकार सतीश देशपांडे यांनी एकहाती सजवलेल्या या 'सृष्टिविज्ञान गाथे'च्या निमित्ताने तुमच्या भेटींचा भाग्ययोग सुरू झाला आणि मग तुमच्या आणि मंगलाताईंच्या लेखणीतून उतरलेल्या आकाशाशी जडले नाते, नभात हसरे तारे, गणित आणि विज्ञान : जुगलबंदी, समग्र जयंत नारळीकर (कादंबरी), गणित गप्पा अशा अन्य पुस्तकांच्या माध्यमातून हा भाग्ययोग वारंवार वाट्याला आला.

तुमच्याबरोबरची 'आयुका'तील भेट असो, घरी 'खगोल'मधली भेट असो, फोनवरची वा सामकांकडून आलेल्या चिठ्ठीतील सूचनाभेट असो, प्रत्येक वेळी तुमच्या आणि मंगलाताईंच्या ऋजू व्यक्तिमत्त्वातून, अकृत्रिम स्नेहातून, सौम्य वागण्यातून अन् आपुलकीच्या बोलण्यातून जिव्हाळ्याचा झरा झुळझुळत असायचा. तुम्ही केलेल्या एखाद्या मार्मिक निरीक्षणातून चाललेल्या कामावर आणि त्यातील बारीकसारीक तपशिलावरही तुमची कशी घारीसारखा बारीक नजर आहे, याचीही जाणीव व्हायची.

सर, 'आयुका'चा सगळा परिसर आणि तिथल्या वास्तू या साऱ्याची उभारणी तुमच्या निगराणीखाली ख्यातनाम वास्तुविशारद चार्ल्स कोरिया यांनी केली होती. विज्ञान आणि कला, गणित आणि सौंदर्यशास्त्र यातील अभिन्नत्वाची जाणीव करून देणारी ही आगळीवेगळी रचना. प्रेरणा आणि स्वास्थ्य, ऊर्जा आणि विश्राम यांचा एकत्र अनुभव देणारे हे स्थळ विज्ञानमंदिर बनले, ते तुमच्या कर्तृत्वामुळे.

तुमची 'खगोल'मधील सदनिकाही अशीच आगळीवेगळी. एखाद्या आश्रमाचे पावित्र्य वागवणारी. रोजच्या दुधाच्या रतिबासंबंधी सूचना देणाऱ्या साध्या गोष्टीसाठीही तुम्ही दाराबाहेर एक चक्र टांगलेले. आत असलेल्या प्रत्येक वस्तूशी कुठल्या ना कुठल्या महनीय व्यक्तीशी नाते जुळलेले. मग ते एखाद्या महान चित्रकाराच्या कुंचल्यातून उतरलेले निसर्गचित्र असेल किंवा आर. के. लक्ष्मणच्या रेषांनी साकारलेले तुमचे अर्कचित्र. काम संपले किंवा बराच वेळ चालले, तर मंगलाताई

आवर्जून चहाची आठवण करून देणार. मग तुम्ही संथ पावले टाकत कोपऱ्यातल्या टेबलापाशी तुमच्या ठरलेल्या खुर्चीवर बसणार. मग तुम्हा दोघांच्या स्वभावाला साजेसा सौम्य चहा आणि त्याच्याबरोबर काहीतरी खास पदार्थ. 'खगोल'मध्ये ये-जा करताना आपण एका ऋषितुल्य जोडप्याच्या आश्रमात येत-जात आहोत, असे वाटायचे.

२०२१मध्ये तुम्ही नाशिक येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालात, त्या वेळी सर्वांची भावना अशीच होती, 'या निमित्ताने साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाला उंची लाभली.' खरे तर असे कितीतरी सन्मान यापूर्वीच तुम्हाला लाभले होते, पण सामान्य माणसाच्या मनी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, साहित्याच्या प्रांतात वैज्ञानिक साहित्याला सन्मानाचे स्थान लाभावे, साऱ्या समाजात विज्ञानप्रियतेचा विकास व्हावा या हेतूने तब्येतीची पुरेशी साथ नसतानाही तुम्ही हे अध्यक्षस्थान भूषवले आणि आपल्या अध्यक्षीय भाषणातून यथायोग्य मार्गदर्शन केले. विज्ञानाबद्दलची आस्था तुमच्या अगदी बारीकसारीक गोष्टींतूनही प्रकट व्हायची. कुठल्याही सार्वजनिक कार्यक्रमात कुणी - विशेषत: मुलांनी तुमची सही मागितली, तर तुम्ही सांगायचात. ''मला विज्ञानातील शंका विचारणारे पत्र पाठव, मी तुला उत्तर पाठवीन, त्यात तुला माझी सही मिळेल.''

सर, तुम्ही केलेले शास्त्रीय संशोधन म्हणजे आमच्या दृष्टीने आकाशातल्या नक्षत्रांची भ्रमणे, पण तुम्ही ललितलेखनातून ज्या वैज्ञानिक कथा अन् कादंबऱ्या लिहिल्यात, त्या मराठीच्या ललितक्षेत्रातील एक वैभवी दालन आहे. एखाद्या कसलेल्या लेखकाने रचलेले घाट वाटावेत अशी रचना तुम्ही या कथा-कादंबऱ्यांमधून साकारली आहे. त्या वाचताना सारेच लहान-थोर त्यांत गुंगून आणि गुंतून जातात, रममाण होतात. 'समग्र नारळीकर' या प्रकल्पात तुमच्या कादंबऱ्यांचा पहिला खंड प्रकाशित झाला. कथांच्या खंडाचे काम सुरू असताना मंगलाताईंनी या जगाचा निरोप घेतला. येत्या काही महिन्यांमध्ये या खंडाचे काम पूर्ण होणार अशी चिन्हे दिसत असताना तो साकार झालेला पाहण्यास तुम्ही आमच्याबरोबर नाही आहात.

मात्र तुमचे संशोधन, तुमचे लेखन, तुमच्या स्मृती विज्ञानाची पताका अधिकाधिक उंच फडकवतील. विश्वाचे रहस्य उलगडण्यासाठी आणखी एक पायरी वर चढण्याचा प्रयत्न करण्याची प्रेरणा देतील.

**डॉ. सदानंद बोरसे**

*(दै. 'लोकमत'च्या सौजन्याने)*

## ।। श्रद्धांजली ।।

*ज्येष्ठ रंगकर्मी, नाट्यसमीक्षक माधव वझे यांचे दि. ५ मे, २०२५ रोजी दु:खद निधन झाले. 'राजहंस प्रकाशन' परिवाराकडून माधव वझे यांना आदरांजली.*

*'प्रायोगिक रंगभूमी- तीन अंक' (अनुवाद/संपादन : माधव वझे, राज्य शासन पुरस्कार), 'रंगमुद्रा' (राज्य शासन पुरस्कार प्राप्त), 'श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी', 'नंदनवन', 'समांतर रंगभूमी : पल्याड-अल्याड' ही त्यांची पुस्तके राजहंस प्रकाशनाकडून प्रकाशित झाली आहेत.*

*ज्येष्ठ रंगकर्मी, अभिनेते, लेखक अभिराम भडकमकर यांनी लिहिलेला श्रद्धांजलीपर लेख येथे प्रकाशित करत आहोत.*

---

माधव वझे म्हटलं की 'श्याम' हेच बहुतेकांना आठवतं. ते गेल्यानंतर वर्तमानपत्रातल्या मथळ्यांमध्येही प्रकर्षानं हाच उल्लेख होता आणि का असणार नाही? 'श्यामची आई' या चित्रपटानं गेल्या कित्येक पिढ्यांवर प्रभाव टाकला आहे. माधवसरांची त्यातली भूमिका ही अत्यंत प्रशंसनीय ठरली होती. परंतु या ओळखीचं कुठलंही ओझं मनावर न बाळगता सरांनी त्यानंतर रंगभूमीवर अभ्यासक, प्रशिक्षक आणि दिग्दर्शक म्हणून बजावलेल्या भूमिका याही अत्यंत मोलाच्या होत्या. मात्र त्यावर फारसं बोललं जात नाही.



सुरुवातीच्या चित्रपटातच इतकं दमदार यश मिळाल्यानंतर आणि तरुणपणी 'वहिनीच्या बांगड्या'सारखा यशस्वी चित्रपट केल्यानंतरही सरांची रंगभूमीशी असलेली निष्ठा आणि नाळ तुटली नाही. ते रंगभूमीवर अभिनेता म्हणून वावरले, तरी दिग्दर्शक आणि अभ्यासक किंवा प्रशिक्षक म्हणून अधिक वावरले.

रंगभूमीचं प्रशिक्षण याला फारशी मान्यता नसल्याच्या काळात त्यांनी 'जागर'सारख्या संस्थेची स्थापना करून, कार्यशाळा घेऊन त्यात रंगकर्मी घडवले. नाटक ही गंभीरपणे करायची गोष्ट आहे, हे सर्वप्रथम ते मनावर बिंबवत असत आणि मग नटाचं शरीर आणि मन यांवर ते काम करत असत. त्यातही केवळ

पुस्तकी धडे नसत, तर नटाला त्याच्या आवाजाची नेमकी पट्टी काय, ती कशी सापडेल आणि मग तो इतर पट्ट्यांमध्ये कसा लीलया खेळू शकेल यांकडे ते लक्ष देत. तरुण रंगकर्मी अमृत सामक याचा याबद्दलचा अनुभव अगदीच वाचनीय आहे.

'जागर' ही संस्था हौशी रंगकर्मींना एकत्र आणून व्यासपीठ देणारी होती. या संस्थेतर्फे त्यांनी अनेक नाटकं केली; ज्यात 'राजा ईडीपस', 'तुघलक', 'यकृत' इत्यादी नाटकांचा समावेश आहे. एकीकडे व्यावसायिक रंगभूमीवर विजया मेहता, अरविंद देशपांडे, दामू केंकरे चौकटीपलीकडचं काम करत असताना सर हौशी रंगभूमीवर वेगवेगळ्या गोष्टी करून पाहत होते.

त्यांची नाट्यसमीक्षा तत्कालीन सनसनाटी, तुच्छतावादी किंवा परिचयात्मक असणाऱ्या समीक्षेत उठून दिसणारी होती. केवळ कथेभोवती न फिरता नेपथ्य, संगीत, प्रकाश, अभिनय यांतील बारकावे टिपत निसरड्या जागा दाखवणारी आणि म्हणूनच रंगकर्मींना आत्मपरीक्षण करायला मदत करणारी होती.

मात्र ते आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाचे सभासद असले, त्या निमिताने त्यांनी महोत्सवांना हजेरी लावली असली, तरी त्यांनी त्यावर विपुल प्रमाणात लिखाण का केलं नाही हा प्रश्नच पडतो. नंतर त्यांना 'राजहंस'नं लिहितं केलं. मग त्यांच्यातला लेखक इथे बहरून येऊ लागला आणि त्यांनी रंगभूमीच्या अभ्यासकांना वैचारिक खाद्यच पुरवलं.

ते कर्ते रंगकर्मी असले, तरी त्यांचा पिंड वैचारिक चिंतनाचाच होता. म्हणूनच त्यांनी रंगभूमीवरील दिग्गजांच्या घेतलेल्या मुलाखतींत त्यांच्या जीवनप्रवासापेक्षा, आयुष्यातील तपशिलांपेक्षा सर्जनशील निर्मितीचा प्रवास आणि त्यामागची वैचारिक बैठक यांवरच ते लक्ष केंद्रित करतात. मग या मुलाखती रंगकर्मी आणि नाट्यरसिक यांना एक वेगळं वैचारिक आणि कलात्मक भान देऊन जातात.

त्यांच्यातला अभ्यासक हा पुस्तकरूपानं खूप लवकर आपल्यासमोर यायला हवा होता, याची खंत सतत वाटत राहते. तरी 'प्रायोगिक रंगभूमी : तीन अंक' (अनुवाद संपादन), 'रंगमुद्रा', 'समांतर रंगभूमी : अल्याड पल्याड', 'नंदनवन' (नाटक), 'श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तकं. यांपैकी 'श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी' हे वेगळ्याच बाजाचं पुस्तक आहे. चित्रपटनिर्मिती, त्यात दंग असलेले अत्रे आणि त्यातून घडणारं त्यांचं दर्शन अत्यंत मनोरंजक, पण निरीक्षण तितकंच सखोल आहे.

याखेरीज अनेक विषय त्यांच्या डोक्यात खेळत होते आणि त्यांना वेळ मिळाला असता, तर अनेक पुस्तकं आपल्याला लाभली असती.

एक व्यक्ती म्हणून ते खूप मोकळ्या स्वभावाचे होते. कधीही फोन करून

अथवा भेटून गप्पा मारायची आणि मोकळं व्हायची जागा म्हणून रंगकर्मी त्यांच्याकडे पाहत असत. अशा वेळी त्यांच्यातला शिक्षक आणि मार्गदर्शक आपल्याला भेटे. त्यांच्याशी तुमचे वैचारिक वाद होऊ शकत, राजकीय मतांवर खडाजंगीही होऊ शके, त्यांच्या अनेक मतांशी असहमत होण्याचे स्वातंत्र्यही तुम्हाला असे. पण या सगळ्याचा नात्यावर कधीही परिणाम होत नसे. किंबहुना विद्यार्थ्याला जेवढं मोकळेपणानं व्यक्त होऊ देता येईल, तेवढं चांगलं; अशा भावनेनं ते चर्चा करत असत. आजच्या हटवादी आणि कंठाळी वैचारिक वातावरणात भल्याभल्यांनी भान सोडलेलं दिसत असताना सरांनी त्यांच्यातली ही आत्मीयता आणि उदारता न गमावणं खूपच मोलाचं होतं.

बदलत्या काळातही तालमीचं गांभीर्य त्यांना होतं. त्यांच्या अलीकडच्याच 'हॅम्लेट' या नाटकामध्ये अनेक रिप्लेसमेंट कराव्या लागल्या, वेळ वाया गेला. पण ते दरवेळी तितक्याच उत्साहानं जणू नव्यानंच करतो आहोत अशी सुरुवात करत राहिले.

आधुनिक रंगभूमीचा बहराचा काळ असं ज्या दशकांना म्हटलं जातं, त्या दशकांत पुण्यातल्या रंगभूमीवरचं माधव वझे यांचं स्थान हे खूप महत्त्वाचं ठरतं.

सरांना श्रद्धांजली वाहताना डोळे पाणावताहेत आणि त्यांनी दिलेल्या विचारांची डोक्यात गर्दी झाली आहे. आज सर नाहीत, पण त्यांचा विचार सोबत राहील... कायमचा!

**अभिराम भडकमकर**

## ।। श्रद्धांजली ।।

ज्येष्ठ सामाजिक लेखिका अरुणा देशपांडे यांचे दि. २५ मे, २०२५ रोजी दुःखद निधन झाले. 'राजहंस प्रकाशन' परिवाराकडून अरुणा देशपांडे यांना आदरांजली.



'के हर ख्वाहिश पे' (राज्य शासन पुरस्कार प्राप्त) या राजहंस प्रकाशनाकडून प्रकाशित कादंबरीमध्ये त्यांनी सामाजिक चळवळीतील लोकांच्या जीवनातील वैयक्तिक संघर्षावर भाष्य केले आहे.

# राजहंसी ग्रंथसृष्टी

## आबली

*लिखाणातील ओघवतेपणा, आलंकारिक शब्दांत अडकण्यापेक्षा रोजच्या जगण्यातील वापरलेली बोलीभाषा आणि वेगळे जग दाखवणारे मुलांचे भावविश्व यामुळे या संग्रहातील प्रत्येक कथा मनाला भावणारी आहे.*

प्रमोद प्रकाश धायगुडे यांचा राजहंस प्रकाशननं प्रकाशित केलेला 'आबली' कथासंग्रह नुकताच वाचला.

सहज, सोप्या, ओघवत्या आणि थेट काळजाला भिडणाऱ्या लेखनशैलीमुळे या कथासंग्रहातील प्रत्येक कथा, त्यातलं पात्र, घटना या सर्व गोष्टी डोळ्यांसमोर हुबेहूब उभ्या राहतात. अस्सल ग्रामीण शब्दांमुळे या कथा वाचकाला अधिक जवळच्या आणि आपल्या वाटतात. आबली कथेनं शेवटाला कधी डोळे पाणावले ते समजलंही नाही.

शहरी व ग्रामीण जगण्यातलं वेगळेपण 'सुट्टी' या कथेतून लेखकानं अगदी सहजपणे मांडलंय. धीरजचं मुंबईतील जगणं आणि गावखेड्यातील जगणं यामध्ये लेखकानं जी गुंफण घातलीय ती विशेष भावली. 'सुट्टी' कथा वाचताना मी माझ्या आजोळात हरवून गेलो.

हल्ली सर्व सुखसोई असताना देखील दिवाळी फार 'गोड' वाटत नाही. अशा वेळी भिवाची 'आकाशकंदील' ही कथा वाचकाला अंतर्मुख करते. मेंढरांसोबत कोकणाला निघालेला भिवा त्याच्या बिऱ्हाडावर जसा आकाशकंदिलाचा उजेड आणतोय तसाच तो मला माझ्या बालपणातल्या दिवाळीत परत रमण्यासाठी 'फ्लॅशबॅक' ठरतोय. या कथेतील भिवा म्हणजे स्वत: लेखकच असावा इतक्या बारकाव्यांसह या कथेचं लेखन केल्याचं जाणवतं.

रोजची चूल पेटवण्यासाठी काटेकुटे आणि दगडधोंड्यांचा सामना करत कसा संघर्ष करावा लागतो हे झिंगऱ्या कथेतून समजते. अस्सल बोलीभाषेतील शब्दरचना आणि लिखाणातील ओघवतेपणा यांमुळे या अवलिया लेखकाच्या 'खोरात' वाचक आपसूक गुंतत जातो.

'पाटी' कथा वाचून माझ्या बालपणीच्या कितीतरी कडू-गोड आठवणी जाग्या झाल्या. मी ऊसतोड कामगारांच्या जिल्ह्यातला आहे. ऊसतोडणीला आईबाबा गेले की प्रत्येक घरी एक 'संपा' घर सांभाळतो. हा संपा वयानं लहानच असतो पण

परिस्थितीमुळे तो आपल्या कुटुंबाविषयीच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी काम करतच राहतो. स्वत:च्या लहान बहिणीला शाळेची पाटी देण्यासाठी संपा करत असलेला संघर्ष पाहून 'पाटी' कथेच्या शेवटाला रोखून धरलेले अश्रू गालावर कधी ओघळले ते समजलंच नाही.

प्रत्येक शाळेत एक 'रचनाबाई' स्वयंस्फूर्तीनं तयार झाल्या, तर एकही भारती या देशात शिक्षणापासून वंचित राहणार नाही. वाचादोष मुलीच्या शिकण्यावर आधारित असलेली 'डूल' ही कथा ग्रेट वाटली.

या कथासंग्रहातील शेवटची असलेली 'बैजी' कथा वाचल्यावर फूटपाथावरील मुलांचं भावविश्व समजण्यास मदत होते.

लिखाणातील ओघवतेपणा, आलंकारिक शब्दांत अडकण्यापेक्षा रोजच्या जगण्यातील वापरलेली बोलीभाषा आणि वेगळं जग दाखवणारं मुलांचं भावविश्व यामुळे या संग्रहातील प्रत्येक कथा मला विशेष भावली.

लेखनाचा दर्जा पाहता या पुस्तकाला उज्ज्वल भविष्य आहे असा विश्वास वाटतो. लवकरच आणखी कथा नवीन पुस्तकाच्या माध्यमातून वाचण्यास मिळाव्यात.

लिखाणास आभाळभर शुभेच्छा.

**जगदीश पवार**, बीड
९९७०२३४८०९



मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढावी,
म्हणून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये
अनेक अभिनव उपक्रम राबविणाऱ्या
एका शिक्षकाने लिहिलेल्या या कथा!

स्थानिक बोली अन् ग्रामीण मातीचा
गंध असलेल्या,
ग्रामीण आयुष्याचे अनेक पदर
वाचकांसमोर आणणाऱ्या...

## आबली

प्रमोद प्रकाश धायगुडे

किंमत : ₹ १००/- । (ट.ख. ₹ ५०)

## 'बुक लव्हर्स क्लब'चे पाऊल पडते पुढे

बेळगावच्या लोकमान्य ग्रंथालय प्रणीत 'बुक लव्हर्स क्लब'चे नाव आता बेळगाव महानगरासह इतरत्रही सुपरिचित झाले आहे. २०१५ साली बेळगावचे पुस्तकप्रेमी कै. शंकरराव चाफाडकरांच्या पुस्तकांनी खचाखच भरलेल्या निवासस्थानी दर रविवारी भेटणाऱ्या व पुस्तकावर चर्चा करणाऱ्या कै. अशोक याळगीसह कांही मित्रांनी सहजपणे हसतखेळत 'बुक लव्हर्स क्लब'ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. बेळगावचे ज्येष्ठ साहित्यिक श्री. सुधीर जोगळेकरांच्या अध्यक्षतेखालील टीमने काम सुरू केले. आधी फक्त रविवारी सकाळी, मग आठवड्यातून दोनदा अशा विविध स्थित्यंतरांतून जाताना, अगदी कोरोनासारख्या कठीण समयीही ऑनलाईन माध्यमातून साप्ताहिक पुस्तकपरिचयाचा कार्यक्रम अव्याहतपणे सुरू आहे. सध्या 'बुक लव्हर्स क्लब' किंवा 'बुलक' म्हणजे दर आठवड्याला शुक्रवारी संध्याकाळी ठीक सहा वाजता लोकमान्य ग्रंथालयाच्या सभागृहात एखाद्या वक्त्याने वा पुस्तकप्रेमीने आपल्याला आवडलेले कुठलेही नवे-जुने पुस्तक चाळीस-पन्नास मिनिटांत मांडणे, सादर करणे, परिचय करून देणे. नंतर पुढील वीस मिनिटे उपस्थित सर्वांशी चाय पे चर्चा म्हणजे चहा घेत घेत पुस्तकावर चर्चा असा आटोपशीर दीड तासाचा कार्यक्रम. पूर्णपणे नि:शुल्क, सर्वांना खुला. याप्रमाणे आठवड्याला एक, महिन्यातून चार वा पाच म्हणजेच वर्षात जवळजवळ पन्नासहून अधिक पुस्तके मांडली जातात, ऐकली जातात हा एक अनोखा उपक्रम होय. पुस्तकपरिचयासाठी भाषेची अट नाही. पुस्तकाची माहिती सांगा किंवा तुमचं मत वाचून दाखवा अथवा दृक्‌श्राव्य माध्यमातून मांडा, सर्वस्वी स्वातंत्र्य वक्त्याचं आणि त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान / व्यवस्था लोकमान्य ग्रंथालय उपलब्ध करून देते.

कोणतेही पुस्तक छोट्याशा अवधीत मांडता येणे अशक्य, म्हणूनच 'ये तो अभी ट्रेलर था, पिक्चर अभी बाकी है' हे तत्त्व पाळले जाते, जेणेकरून श्रोत्यांनी पुस्तक मिळवून वाचावे हा हेतू.

'बुलक'तर्फे कोणत्याही बंधनाशिवाय व्यक्त होण्यासाठी नवनव्या वक्त्यांना एक मुक्त व्यासपीठ अशा रितीने उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासह आणि याशिवाय पुस्तक प्रकाशन, परिसंवाद, कविता सादरीकरण, अभिवाचन, लेखक, कवींच्या

मुलाखती, बेळगावच्या अक्का ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांचा स्मृतिदिन, मराठी भाषा दिवस, देशाच्या विविध भागांतून बेळगावला भेट देणाऱ्या साहित्यिकांशी गप्पाटप्पा असे वैविध्य. अशा वेळी 'बुके नाही बुक, गुलाब नहीं किताब, पुष्प नाही पुस्तक' हा नियम पाळला जातो. म्हणजे पाहुण्यांचे स्वागत मोठाले पुष्पगुच्छ न देता पुस्तक देऊन केले जाते.

मंथन, वसंत व्याख्यानमाला, सार्वजनिक वाचनालय, सरस्वती वाचनालय, वाङ्मय चर्चा मंडळ, बाग कविता परिवार, शब्दगंध कवी मंडळ, हिंदी मैत्री मंच, खास युवकांचा असलेला बेळगावी बुक क्लब, काकडे फौंडेशन, धनश्री सोसायटी यांच्यासह एकत्रितही उपक्रम राबवले जातात.

'बुलक'ने बालिका आदर्श विद्यालयाची आठवीची तुकडी दत्तक घेऊन मुलींना साहित्यिक मार्गदर्शन केले-करीत आहे. विद्यार्थ्यांसाठीही विशेष कार्यक्रम आखले जातात. स्थानीय वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक मीडिया या सर्व उपक्रमांना वेळोवेळी प्रसिद्धी देऊन सहयोग देतात. आजच्या घडीला 'बुलक'च्या व्हॉट्सॲप समूहाचे दोनशे सदस्य असून बेळगावसह फ्रान्स, दुबईचे मराठी सदस्य यात आहेत. या समूहावर केवळ आणि केवळ साहित्यिक देवाणघेवाणच होते. प्रा. माधुरी शानभाग, डॉ. विनोद गायकवाड, सुधीर जोगळेकर, प्रा. सुभाष सुंठणकर, प्रा. संध्या देशपांडे, सौ. मेधा मराठे, प्रतिभा आपटे, ज्येष्ठ व्यंगचित्रकार जगदीश कुंटे ही व बेळगावची अन्य प्रथितयश साहित्यिक मंडळी सदैव मार्गदर्शन करतात, भाग घेतात. सुधीर जोगळेकर, निखील नरगुंदकर, जगदीश कुंटे, कै. अशोक याळगी, अशोक ओऊळकर, मंगेश देऊळकर, चैतन्य हलगेकर, आरती आपटे, अनघा वैद्य, प्रसाद कुलकर्णी, किशोर काकडे, संजीव जोशी अशी नवी-जुनी कार्यकारिणी सतत काम करीत असते. वाचनसंस्कृती वाढावी,




'सळाळ आणि सळाळनंतर...', 'समांतर', 'मथितार्थ',
व 'इत्यादी' या कवितासंग्रहांनंतरचा
श्री. भा. जोशी यांचा हा पाचवा कवितासंग्रह.
समग्र समाजमन आणि कालखंड यांच्या सोबतीनं
केलेला हा काव्यप्रवास
वाचकांनाही समृद्ध असा अनुभव देईल असा...

**त्यानंतर**

श्रीपाद भालचंद्र जोशी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

विद्यार्थ्यांसह पालकांनीही पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त पुस्तके वाचावीत असा प्रयत्न असतो. याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून बेळगावातील एका व महाराष्ट्रातील एका महाविद्यालयासह एमओयु म्हणजे साहित्यिक देवाणघेवाणीचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. लोकमान्य ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष जगदीश कुंटे व समर्पित स्टाफ हा महत्त्वाचा भाग आहेच. ‘टुडेज रिडर्स टुमारोज लिडर्स’ असे बोधवाक्य असलेला, एक बालक पुस्तक वाचत असलेला २०१५चा लोगो - आता पुस्तकांचा संच असलेला २०२५चा नवा लोगो अशी दहा वर्षांची आजवरची सुंदर वाटचाल! असा हा दहावा वर्धापन म्हणजे निश्चितपणे आम्ही म्हणू शकतो की ‘बुक लव्हर्स क्लबचे पाऊल पडते पुढे. सतत पुढे.’ विकसित भारत २०४७कडे जाताना ‘हर घर तिरंगा’प्रमाणे ‘हर घर ग्रंथालय’ असावे, अशी भावना आहे, प्रयत्नही आहे.



***किशोर मधुकर काकडे***

९४४९८५८६१८


---


ही कहाणी आहे आजच्या काळाची, वर्तमानातील व्यक्ती आणि जनमानसाची! सई नावाची धैर्यवान मुलगी जातीभेदांशी, प्रतिकूल परिस्थितीशी कसा लढा देते, आपली स्वप्नं वास्तवात आणताना येणाऱ्या अडथळ्यांशी कशी झुंजते, आपलं भविष्य घडवताना त्याला डागाळणाऱ्या वर्तमानाशी कसा सामना करते हे सारं अनुभवणं विलक्षण आहे. दिलीप फडके यांची ही मराठीतील पहिलीच कादंबरी वाचकांना स्तिमित करणारी आहे.

सई आणि रोहन या व्यक्तिरेखांच्या रूपाने लेखक समस्यांची गुंतागुंत उलगडत वाचकांनाही जीवनाचा वेध घेण्यास, वास्तविकतेचे रंग डोळसपणे पाहण्यास प्रवृत्त करतात.

तेव्हा नक्कीच वाचायला हवी अशी ही कादंबरी...

वास्तविकतेचे रंग

दिलीप फडके

किंमत : ₹ २५०/-

(ट.ख. ₹ ५०)



अभिनंदन!

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे



अपर्णा मोहिले पुरस्कृत
कै. सतीशचंद्र दत्तात्रय मोहिले
स्मृती पुरस्कार

**अभिषेकी**

◆

शैला मुकुंद



---



कीर्तन संजीवनी पुष्पलता
रानडे पुरस्कृत लक्ष्मीबाई
टिळक पारितोषिक

**पाषाणाचे पाझर**

◆

विवेक गाडगीळ



---



प्रा. उमाकांत कीर पुरस्कृत
कृष्णाजी वामन कीर
पारितोषिक

**टीव्ही, मालिका आणि
बरंच काही...!**

◆

मुग्धा गोडबोले



**अभिनंदन!**

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे



शंकर पाटील
स्मृती पुरस्कार

**बाय गं**

◆

विद्या पोळ - जगताप



---



कृष्ण मुकुंद
स्मृती पुरस्कार

**वस्त्रगाथा**

◆

विनय नारकर



---





बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल
मुख्य शाखा पुरस्कृत बँकिंग
क्षेत्रातील पुस्तकासाठी पुरस्कार

**सायबर ॲटॅक**

◆

डॉ. संजय तुंगार
सुधीर साबळे



अभिनंदन!

आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी



लक्षणीय गद्य साहित्यकृती
पुरस्कार

**चंद्रकांत कुलकर्णी**
**सादर करीत आहे...**

◆

चंद्रकांत कुलकर्णी



महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

अभिनंदन!

आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी

वा. म. जोशी
पारितोषिक
(कादंबरी)





विनायक श्रीधर
देशपांडे
उत्कृष्ट कादंबरी
पुरस्कार

**सीता** ◆ अभिराम भडकमकर



अलौकिक प्रतिभावंत, विश्वशांतीचा प्रणेता, दलितांचा कैवारी, सत्याचा सांगाती, अविरत आत्मसंशोधक, अभिनव शिक्षणतज्ज्ञ... अनंतमिती व्यक्तिमत्त्व होते काउंट लिओ टॉलस्टॉय यांचे. या प्रतिभाशाली महामानवाची ही जगावेगळी जीवनकथा...

**टॉलस्टॉय** एक माणूस

सुमती देवस्थळे

आवृत्ती पाचवी । किंमत : ₹ ९००/- । (ट.ख. ₹ ५०)

# अभिजात मराठीची अक्षरप्रभा

*अलौकिक प्रतिभावंत, विश्वशांतीचा प्रणेता, दलितांचा कैवारी, सत्याचा सांगाती, अविरत आत्मसंशोधक, अभिनव शिक्षणतज्ज्ञ असे अनंतमिती व्यक्तिमत्त्व असणाऱ्या काउंट लिओ टॉलस्टॉयचे 'टॉलस्टॉय एक माणूस' हे सुमती देवस्थळी लिखित चरित्र एक अक्षरठेव आहे. आपणांस आजही चिंतनशील होईल असा हा 'युद्ध आणि शांती' या प्रकरणातील संपादित अंश.*

## टॉलस्टॉय : एक माणूस

१८६३च्या अखेरीस 'युद्ध आणि शांती' या कादंबरीच्या लेखनास सुरुवात झाली. प्रत्यक्ष लेखनास पुरी सहा वर्षे लागली. असंख्य व्यक्तिरेखा, अनेक लहान-मोठ्या घटनांचा भव्य विस्तार, नेपोलियनची रशियावर स्वारी, युद्धातील चित्तथरारक प्रसंग, तत्कालीन खानदानी रशियन लोकांचे कौटुंबिक जीवन, सामान्य लोकांचे वैयक्तिक जीवन, लष्करी कारवाया, नृत्ये, मेजवान्या, शिकारी इ. अक्षरशः असंख्य घटनांच्या तपशिलाने हे भव्य वाङ्मयीन शिल्प आकार घेऊ लागले. साहित्यक्षेत्रात ही कादंबरी म्हणजे 'न भूतो न भविष्यति!' अशा स्वरूपाचे कैलास लेणे आहे. 'मानवी जीवनाचे संपूर्ण चित्रण, तत्कालीन रशियाचे प्रत्ययकारी वर्णन, तत्कालीन ऐतिहासिक महत्त्वाच्या घटना व मानवी संघर्ष यांचा संपूर्ण आलेख, आनंद-उदात्तता-यातना-अवमान-महत्त्वाकांक्षा इ. नानाविध मानवी भावतरंगांचे जिवंत प्रत्ययकारी चित्रण म्हणजे 'युद्ध आणि शांती' ही कादंबरी-' हा स्ट्रॅकॉव्हसारख्या तज्ज्ञ टीकाकाराचा अभिप्राय म्हणजे या कादंबरीच्या शिफारशीचा एक ताम्रपटच.

मोहरीएवढ्या बीजापासून प्रचंड अश्वत्थवृक्ष उभा राहावा तशी ही कादंबरी वाढत गेली. कादंबरीच्या उत्क्रांतीच्या पायऱ्यासुद्धा पाहण्यासारख्या आहेत. त्यातून टॉलस्टॉयची लोकोत्तर कल्पनाशक्ती, संवेदनशीलता, अभ्यासू वृत्ती आणि घटनांचा नेमका वेध घेणारी अंतर्भेदी प्रतिमा दिसून येते.

या अभ्यासातून टॉलस्टॉयला अत्यंत महत्त्वाचा चित्तथरारक विषय मिळाला आणि

एक अर्थपूर्ण सत्यही गवसले. युद्ध ही असंख्य बिनचेहऱ्यांच्या निनावी लोकांच्या सहकार्याने घडून येणारी एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना आहे. त्या निमित्ताने होणाऱ्या लक्षावधी उलाढालींची व रक्तपाताची जबाबदारी कोणा एक-दोघा व्यक्तींकडे असू शकत नाही. असल्या प्रचंड घटनांना एखादा अलेक्झँडर, सीझर वा नेपोलियन केवळ निमित्तमात्र असतो, 'लेबल' लावण्यापुरता असतो. असंख्य जनमनांतील आवेगांना काबूत ठेवण्याचे किंवा त्यांना इष्ट ते वळण लावण्याचे सामर्थ्य कोणत्याही एका व्यक्तीत सामावलेले असणे, ही गोष्ट वस्तुतः अशक्य आहे. असंख्य प्रमाणभूत ग्रंथांतून हा आशय टॉलस्टॉयला हळूहळू स्पष्ट जाणवला. त्यामुळे त्याने केवळ ऐतिहासिक व्यक्तींच्या आणि घटनांच्या पलीकडे जाऊन इतिहासविषयक तत्त्वज्ञान मांडून दाखविले, इतिहासाचा अर्थ लावून दाखविला. ऐतिहासिक घटनांचा समग्र अर्थ उलगडून दाखविण्याची जी मानवतावादी दृष्टी टॉलस्टॉयने स्वीकारली ती अभिजात, अभिनव अशी आहे.

'युद्ध आणि शांती' या कादंबरीत नेपोलियनची रशियावर स्वारी, मॉस्कोदहन, फ्रेंचांची माघार, सैन्याची ससेहोलपट या ऐतिहासिक महत्त्वाच्या घटना आहेत. पण टॉलस्टॉय काही इतिहास लिहीत नव्हता. कादंबरी हे त्याचे माध्यम. ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनदर्शन हा कादंबरीचा खरा विषय. या कादंबरीत सुमारे ५००हून अधिक व्यक्तिरेखा रंगविल्या आहेत. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रत्येकाला वेगवेगळे, स्वयंपूर्ण, सुस्पष्ट व्यक्तिमत्त्व आहे. व्यक्तींनाच काय - कुत्र्यालासुद्धा स्पष्ट व्यक्तिमत्त्व आहे. केवळ व्यक्तिचित्रणाच्या बाबतीतील यश पाहिले तरीसुद्धा या कादंबरीने फार मोठे यश साध्य केले आहे. त्या दृष्टीने टॉलस्टॉय हा पहिल्या दर्जाचा कलावंत ठरतो.

१८६९च्या डिसेंबर अखेरीस टॉलस्टॉयने 'युद्ध आणि शांती' ही प्रचंड कादंबरी पूर्ण केली. कादंबरीची अखेर तासून गुळगुळीत केलेली नाही. त्यामुळे जीवनाचा प्रवाह असाच पुढे वाहत राहणार ही गोष्ट वाचकांना जाणवत राहते. ही कादंबरी सुखान्त नाही आणि शोकान्तही नाही. 'सत्याशी इमान राखणे' एवढाच वाङ्मयीन धर्म टॉलस्टॉय ओळखतो.

प्रस्तुत कादंबरी वाचल्यानंतर एखाद्या विस्तीर्ण महानदीचा प्रवाह पाहिल्यासारखे वाटत राहते. कोणत्या तरी अत्युच्च शिखरावरून ती उगम पावली आणि अशीच अनेक योजने वाहत राहणार आहे. कादंबरी संपली तरी त्यातून निर्माण झालेली जीवनधारा संपत नाही. अखेर प्रिन्स अँड्रीच्या छोट्या बाळाचा उल्लेख त्या दृष्टीने किती अर्थपूर्ण आहे. चिवट जीवनासक्ती अशीच कायम राहणार. कादंबरी संपते ती नवजीवनाच्या तारा जुळवूनच.

❖

# असे जन्मले पुस्तक

## देहभान

*काही माणसं आपल्या आयुष्यात अगदी अचानक येतात, तसेच काही विषयही येतात. लैंगिकता हा विषयही असाच ध्यानीमनी नसताना माझ्या डोक्यात आला आणि 'देहभान' मनात मूर्त होत गेलं.*

वास्तविक मी काही कुणी डॉक्टर वा समुपदेशक नाही, ज्यामुळे लैंगिकता हा माझा अभ्यास विषय होऊ शकेल. पण तसं झालं खरं. आता या गोष्टीलाही बघताबघता सातेक वर्षं झाली. २०१८ साली मी माझ्या एका मित्रासोबत पुण्यात भरत नाट्य मंदिरात नाटक पाहायला गेलो होतो. अजित दळवीलिखित आणि अतुल पेठे दिग्दर्शित या नाटकाचं नाव होतं 'समाजस्वास्थ्य'. ते बेतलेलं होतं रघुनाथ धोंडो कर्वे उर्फ र. धों. कर्वे यांच्या जीवनचरित्रावर. पॅरिसहून शिक्षण घेऊन आलेले 'र.धों.' हे उच्चविद्याविभूषित; पण त्यांना ओळखलं गेलं किंवा आजही त्यांना ओळखलं जातं ते संततिनियमन आणि लैंगिक आरोग्याच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे. शंभर वर्षांपूर्वी आपल्या समाजात लैंगिकतेविषयी 'ब्र'ही काढण्याची मुभा नव्हती. अशा कर्मठ काळात १५ जुलै १९२७ रोजी रधोंनी 'समाजस्वास्थ्य' या मासिकाची सुरुवात केली.




किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

रधोंच्या कार्याची व्याप्ती आणि त्याचं महत्त्व कळल्यामुळे लैंगिकतेच्या विषयाकडे बघण्याची माझी दृष्टीच बदलली. आज एकीकडे तरुणाईचं लग्नाचं वय वाढत असलं तरी लैंगिकतेविषयक प्रश्नांची-समस्यांची व्याप्तीही वाढताना दिसतीय. शालेय किंवा महाविद्यालयीन स्तरावर लैंगिकता शिक्षणाविषयी कुठलंही अधिकृत धोरण-अभ्यासक्रम अस्तित्वात नसल्याचं चित्र आहे. त्यामुळेच माझ्या पत्रकारितेच्या पूर्वानुभवाचा उपयोग करत लैंगिकतेच्या क्षेत्रात काही काम करावं असे विचार

डोक्यात सुरू झाले. योगायोगानं त्याच वेळी स्टोरीटेल या ऑडिओबुक निर्मिती कंपनीकडून मला नवीन पॉडकास्ट सुरू करण्यासंदर्भात विचारणा झाली. मराठीत कोणत्या नवीन विषयांवर पॉडकास्ट करता येतील या संदर्भात त्यांच्याकडून चाचपणी सुरू होती. यात माझी भूमिका केवळ पॉडकास्टरची नाही तर निर्मात्याची असणार होती. त्यामुळेच विषय ठरवण्यापासून ते तज्ज्ञ निवडण्यापर्यंत मला स्वातंत्र्य होतं. या संधीचा लाभ घेत त्यांना मी निरामय लैंगिकता आणि पालकत्व या दोन विषयांवर स्वतंत्र पॉडकास्ट सुरू करण्याचा प्रस्ताव दिला. या विषयांचं महत्त्व जाणत त्यांनीही या विषयांना मान्यता दिली आणि यातूनच ऑक्टोबर २०१८मध्ये माझा ‘सेक्सवर बोल बिनधास्त’ हा लैंगिकतेला वाहिलेला पहिला पॉडकास्ट सुरू झाला. या पॉडकास्टमध्ये मी लैंगिकतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या वैद्यकीय तज्ज्ञांसोबत मोकळा संवाद सुरू केला.

दुसरीकडे पॉडकास्टबरोबरच आणखी कोणत्या माध्यमातून लैंगिकतेचा विषय अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवता येईल या संदर्भात माझे विचार सुरू होते. यातूनच मग लोकसत्ताच्या फिचर्स एडिटर आरती कदम यांचा नंबर मिळवत त्यांच्याशी संपर्क साधला. मी लैंगिकतेच्या विषयावर पॉडकास्ट करतो आणि संधी मिळाली तर या विषयात लिखाण करायलाही आवडेल असं मी त्यांना सांगितलं. त्यांनी मग मला लैंगिकतेच्या वेगवेगळ्या प्रश्नांचा वर्तमानस्थितीतला धांडोळा घेणारा एक दीर्घ लेख लिहायला सांगितला. ‘कामजीवनाला जीवनशैलीचं ग्रहण’ हा माझा लेख लोकसत्ता चतुरंगची कव्हरस्टोरी म्हणून ९ एप्रिल २०२२ रोजी प्रसिद्ध झाला. या पहिल्याच लेखाला राज्यभरातून वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. यातूनच मग सहा महिन्यांनी म्हणजेच जानेवारी २०२३मध्ये शनिवारच्या चतुरंग पुरवणीत ‘देहभान’ ही माझी




पालकांनी मुलांशी संवादासाठी सुरू केलेलं बोलणं
हमखास विसंवादाचं वळण घेतं. हा तिढा सोडवायचा कसा?
प्रक्रिया सोपी नाही, पण प्रयत्नसाध्य नक्की आहे.
त्यासाठी सादर आहे एका बालरोगतज्ज्ञ
समुपदेशिकेचे अनुभवाचे बोल...

प्रिय पालक

अडनिड्या वयातल्या मुलांच्या आईबाबांशी संवाद

डॉ. वैशाली देशमुख

किंमत : ₹ ३२०/- । (ट.ख. ₹ ५०)

लेखमाला सुरू झाली. ही लेखमाला सुरू असतानाच मार्च २०२३मध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. नीलिमा देशपांडे यांच्यासोबत V for Vagina हा लैंगिकतेला वाहिलेला आमचा मराठी-इंग्रजी पॉडकास्ट सुरू झाला. डॉ. नीलिमा यांना पुण्यासह इंग्लंड, भूतान आणि पणजीमध्ये मेडिकल प्रॅक्टिसचा दीर्घ अनुभव आहे. लैंगिकतेशी संबंधित कोणत्याही विषयाकडे बघण्याचा एक जागतिक व्यापक दृष्टिकोन त्यांच्याकडे आहे. त्यांच्यासोबत झालेल्या चर्चांची आणि त्यांनी सुचवलेल्या पुस्तकांची हा विषय मांडताना मोलाची मदत झाली. याबरोबरच 'देहभान'च्या निमित्तानं राज्याच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये-तालुक्यांमध्ये प्रॅक्टिस करत असलेल्या वैद्यकीय तज्ज्ञांशी, समुपदेशकांशी संवाद साधता आला.

लेखमाला संपताना 'देहभान'चं पुस्तक करण्यासंदर्भात अनेक वाचकांनी सुचवलं. पण लेखांच्या संग्रहाचं ते पुस्तक मला इतक्या मर्यादित स्वरूपात साकारायचं नव्हतं. दुसरीकडे राजहंस प्रकाशनासारख्या मातब्बर संस्थेनं देहभान पुस्तकरूपात प्रकाशित करण्यात रुची दाखवल्यानं झालेला आनंद अवर्णनीय होता. लेखमालेचं पुस्तक करताना त्यात आवश्यक ते बदल करण्याच्या दृष्टीनं काही लेखांचा विस्तार केला. आवश्यक तिथे संदर्भ अद्ययावत करण्यात आले. संपादक विशाखा पाटील यांनी पुस्तकाचा खर्डा वाचून या संदर्भात सविस्तर सूचना केल्या. पुस्तक वाचनीय आणि दर्जेदार व्हावं, यासाठीचा त्यांचा आग्रह आमच्या चर्चांमधून जाणवायचा. देहभान हे पुस्तक साकारताना त्याचे विषयानुरूप चार प्रमुख विभाग करण्यात आले. पुस्तकाची सुरुवात विवाहपूर्व लैंगिकता या विभागानं होते. यामध्ये लैंगिकतेच्या वेगवेगळ्या छटांचा, लैंगिकतेकडे बघण्याच्या तरुणाईच्या बदलत्या दृष्टिकोनाचा आणि त्या संदर्भात मनात ठाण मांडणाऱ्या वेगवेगळ्या न्यूनगंडांचा आढावा घेण्यात आला. पुस्तकाचा दुसरा विभाग हा विचारी सहजीवन हा आहे. यामध्ये लग्न ठरवताना लैंगिक अनुरूपतेचा विचार का आवश्यक ठरतो, वैवाहिक नात्याच्या चौकटीत सेक्स टॉइजच्या पर्यायाचा विचार करावा का, संततिनियमनाचे नवे-जुने पर्याय तसंच जोडप्यांनी आपसातल्या संवादाला महत्त्व देतानाच तो कामसंवादही अधोरेखित करणं का आवश्यक आहे, या विषयांचा समावेश आहे. पुस्तकाच्या तिसऱ्या विभागात वेगवेगळ्या लैंगिक समस्यांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये वैवाहिक अपूर्तता, कमी-जास्त होणारी कामेच्छा, शीघ्रपतन, लिंगाच्या ताठरतेच्या समस्या, जननक्षमतेशी संबंधित समस्या, व्यसनाधीनतेचा संसारावर होणारा परिणाम, काम व्यसनाधीनता म्हणजे काय, विवाहबाह्य संबंधांकडे जोडपी का जातात आणि वेगवेगळ्या ताणांचा कामजीवनावर कसा परिणाम होतो या विषयांचा समावेश आहे. पुस्तकाचा चौथा आणि शेवटचा विभाग सुखी संसाराचं गुपित हा आहे. यामध्ये पाळी आणि कामजीवन, रोल प्लेसारख्या गोष्टींचा शृंगारात समावेश करावा का, गर्भारपणातील कामसुख, आईबाबा झाल्यानंतर कामजीवन पूर्ववत करताना घ्यायची काळजी आणि ज्येष्ठांचं कामजीवन

या विषयांचा समावेश आहे.

‘तू लैंगिकतेवर इतकं मोकळेपणानं लिहितोस, पॉडकास्ट करतोस. तुला घरचे काही म्हणत नाहीत का,’ हा प्रश्न मला अनेक जण विचारतात. उलट लैंगिकतेवर लेखमाला लिहायला हवी, हा विचार पहिल्यांदा मनात आला तेव्हा माझ्या पत्नीचा मोहिनीचा त्याला ठाम पाठिंबा होता. वेगवेगळ्या तज्ज्ञांसोबत झडलेल्या चर्चांबरोबरच मोहिनीसोबतच्या गप्पांमधूनही हा विषय आकार घेत गेला. माझी आई सुरुवातीला थोडी साशंक होती. पण माझी विषयाची मांडणी बघता तीही नंतर अगदी निश्चिंत झाली.

पन्नासहून अधिक वर्षं प्रकाशनाच्या क्षेत्रात असलेल्या आणि आजवर हजारो पुस्तकांची निर्मिती केलेल्या दिगमांनी ‘देहभान’च्या संपादक विशाखा पाटील यांच्या मदतीनं माझ्यासारख्या तरुण लेखकासाठी खास सरप्राईज भेटीचं नियोजन करून पुस्तकाची पहिली प्रत माझ्या हाती ठेवली तो क्षण शब्दातीत आहे. आपलं नवकोरं पुस्तक अचानक हातात पडल्यावर लेखकाच्या डोळ्यांतला आनंद बघणं या दिगमांच्या खास दृष्टीचं मला अप्रूप वाटतं. ‘देहभान’च्या जन्माचा हा सोहळा अगदी हृद्य असा आहे



**निरंजन मेढेकर**

९०११०८७७६८



‘लैंगिकता’ या मानवी नात्यांतील मूलभूत पैलूविषयी शास्त्रीय पद्धतीनं भाष्य करत, उत्तम सहजीवनाचा मूलमंत्र देणारं, ज्येष्ठांच्या सहजीवनाचं महत्त्व अधोरेखित करणारं एक आगळंवेगळं पुस्तक.

## देहभान

लैंगिकतेविषयी जाणून घेऊ या...

निरंजन मेढेकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## निरंकुशाचा मुक्तछंद

मी अकरावीत असताना माझा चुलतभाऊ सुहास तांबे ज्याने लिहिलेल्या एकांकिका त्या वेळी पुरुषोत्तममध्ये गाजत होत्या, अचानक सुधीर मोघेंना घेऊन तो आमच्याकडे आला. तेव्हा एक गुणी कवी म्हणून मोघे प्रकाशात येऊ लागले होते. त्यांना त्यांच्या कवितांचं रंगमंचीय सादरीकरण करायचं होतं. त्यासाठी त्यांच्याबरोबर कविता सादर करण्यासाठी एक स्त्री सहकलाकार हवी होती. मी तेव्हा शालेय नाटक, वक्तृत्व, नाट्यवाचन स्पर्धेत भाग घेऊन अनेक बक्षिसं मिळविली होती. म्हणूनच सुहासदादा मोघ्यांना आमच्याकडे घेऊन आला होता. त्यांनी मला एखादी कविता म्हणून दाखवायला सांगितली. मी शालेय पातळीला शोभेल अशा अभिनिवेशात वसंत बापटांची 'भव्य हिमालय तुमचा आमुचा केवळ माझा सह्यकडा' ही कविता म्हणून दाखविली आणि मोघ्यांनी माझी निवड केली. बहुतेक माझे शब्दोच्चार, पाठांतर, हावभाव ह्या प्राथमिक गोष्टीच त्यांनी त्या वेळी बघितल्या असाव्यात. कारण त्यांच्या कविता माझ्या आकलनशक्तीच्या पलीकडच्या होत्या.

मग आमची प्रॅक्टिस सुरू झाली आणि एक मूलभूत प्रश्न उभा राहिला. त्यांच्या कविता कुठेही लिहिलेल्याच नव्हत्या. ही एक विलक्षण गोष्ट होती. तसं मोघ्यांचं व्यक्तिमत्त्वच विलक्षण होतं. त्यांना त्या मुखोद्गत होत्या. पण माझ्यासाठी त्या लिहिणं आवश्यक होतं. मग मीच एक वही तयार केली. संहिता तयार झाली. आता लक्षात येतं की, ते एक ऐतिहासिकच काम माझ्या हातून झालं होतं, मी कविता लिहिल्या खऱ्या, पण ते नुसते शब्द होते. मोघ्यांना अपेक्षित असलेल्या उत्कटतेनं, प्रगल्भतेनं त्या माझ्याकडून म्हटल्या जाणं अवघड होतं. पण तो प्रश्न मोघ्यांनी सहजतेने माझ्या नकळत सोडवला. आमची प्रॅक्टिस ही ठरावीक साच्यातील प्रॅक्टिस नव्हतीच. मोघ्यांना असंख्य गाणी, कविता पाठ होत्या. पाठांतर हा जरा तांत्रिकच शब्द आहे. शांताबाई 'मोघ्यांचं 'स्मरण' फार छान आहे.' असं म्हणायच्या. तर मोघ्यांच्या हातात एकदा पेटी आली की, त्यांना कसलंच भान उरायचं नाही. मराठीतले नामवंत कवी गदिमा, बा. भ. बोरकर, ग्रेस, शांताबाई, कुसुमाग्रज, सुरेश भट, संगीतकार सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर, वसंत पवार, वसंत प्रभू, विश्वनाथ मोरे, रामभाऊ फाटक, हिंदीतले साहिर लुधियानवी, नरेंद्र शर्मा, मदनमोहन, सज्जाद हुसेन, सलील चौधरी, लताबाई, आशाबाई, तलत मेहमूद, महंमद रफी, मुकेश ह्या सर्व आदरणीय कलाकारांची गीतं, कविता ह्यांचा एक अद्भुत खजिनाच त्यांनी माझ्यासमोर खुला

केला. ए गमेदिल क्या करूँ, शामे गमकी कसम, ये मेरा दिवानापन है, कटती है अब तो जिंदगी, चाँद मध्यम है आसमाँ चुप है, अब यहाँ कोई नही आएगा, दिल ही तो है तडप गया, दिल भी तेरा हम भी तेरे अशी मी कधीही न ऐकलेली हिंदी गाणी; रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा, स्वच्छ कोवळे ऊन, कळते सारे मज कळते रे, दिसलीस तू फुलले ऋतू अशी अनवट मराठी गीतं, कविता ते गात राहायचे. त्या अर्थांनी ते गायक नसले तरी बारीकसारीक हरकती, अवघड चाली ते सहज गायचे. कारण शेकडो वेळा ऐकून, तेही एका संवेदनशील कवीच्या कानांनी ऐकून, मनात मुरवून ते गायचे. गाता गाता त्या गाण्यांमधलं मर्म उलगडून सांगायचे. हे सगळे कलाकार, त्यांची गाणी कविता ही मोघ्यांच्या मर्मबंधातील ठेव होती. लताबाई विलक्षण जिव्हाळ्याचा विषय.

लताबाईंच्या गाण्यातला दमसास, लयीचा अंदाज, भावोत्कटता ह्या गुणांमुळे त्यांचं गाणं कसं सर्वश्रेष्ठ ठरतं हे समजावून सांगायचे. हे सगळं ऐकता ऐकता मी भारवून गेलेच, पण नकळत माझ्या कलेविषयीच्या जाणिवा समृद्ध व्हायला लागल्या. त्यांची एक कविता मी सादर करत असे.

*नाहूनिया उभी मी सुकवित केस ओले*
*वेड्या मुशाफिराने त्याचेच गीत केले*

ह्या कवितेतील नाजूक भावना, लयीची आंदोलनं मला कळावीत म्हणून त्यांनी एक हात झोक्यासारखा हलवत 'फैली हुयी है सपनोंकी बाहे आज चल दे कही दूर' हे गाणं म्हणून दाखवलं. मग,

*मौनांच्या संध्याकाळी आकाश स्वरांचे झाले*
*वितळले क्षितिज गंधात रंगातुन रूप निथळले*

ही कविता मी उत्स्फूर्तपणे व्हिस्परमध्ये म्हणजे कुजबुजल्यासारखी, आतल्या




संगीतरचनांच्या मागची विचारप्रक्रिया
आणि तिचे संगीतात होणारे रूपांतर मांडणारा,
एका प्रतिभावान संगीत-दिग्दर्शकाच्या
भव्य संगीत विचारविश्वाचे अद्‌भुत
दर्शन घडवणारा ग्रंथ.

## रंगभास्कर

भास्कर चंदावरकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

आवाजात म्हणू लागले.

ह्या कार्यक्रमात आम्ही काही कविता नुसत्याच म्हणायचो, काही ढोलकीच्या तालावर पण गद्यातच म्हणायचो. जसं की,

*थंडगार सुटे वारा, मोत्यावाणी आल्या गारा,*

*सरसर सर बाई पावसाची, याद मला आली माझ्या राजसाची*

तर काही पेटीच्या सुरांचा आधार घेऊन चालीत म्हणायचो.

मोघे उत्तम संगीतकारही होते. दाटला काळोख होता चहूदिशांना, मन पाखरू पाखरू अशा काही कवितांना त्यांनी फार सुरेख चाली दिल्या होत्या. रंगमंचाच्या काही तांत्रिक गोष्टींचा थोडासा आधार घेतला होता. काही लेव्हल्स वापरल्या होत्या. त्यांच्यावर बसून किंवा संपूर्ण रंगमंचावर वावरत कविता सादर करायचो. त्या त्या स्थानाप्रमाणे प्रकाशयोजना केली होती तर गद्यातून सादर केलेल्या कवितांना उत्कृष्ट पार्श्वसंगीताची जोड होती. सर्वांत शेवटी मोघे त्यांनीच अनुवाद केलेली साहिर लुधियानवीची 'परछाईयाँ' ही दीर्घ कविता सादर करायचे. भारावून टाकणारं, सुन्न करणारं वातावरण निर्माण व्हायचं. दीड तास अथकपणे फक्त कविता, कविता, कविता सादर केल्या जायच्या. कार्यक्रमाचं नावही 'कविता कविता कविता' असंच होतं.

१९७५ किंवा १९७६मध्ये मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या हॉलमध्ये पहिला प्रयोग होता. पुण्यातले अनेक जाणकार, नामवंत, प्रेक्षक म्हणून समोर बसले होते. त्या वेळी हा एक अभिनव प्रयोग होता आणि तो यशस्वी झाला. रसिकांचा खूप सुंदर प्रतिसाद मिळाला. पुण्यात, मुंबईत आणि कोल्हापूरमध्ये असे सहा-सात प्रयोग झाले आणि मोघ्यांना मुंबईतील सिनेसृष्टी खुणावू लागली. खूप उत्तम संधी चालून आल्या. मग हे प्रयोग बंद झाले. नंतर काही वर्षांनी मोघे एकटेच 'कविता पानोपानी' या नावानं हा कार्यक्रम करू लागले. त्याला तुफान लोकप्रियता लाभली. ह्या कार्यक्रमात मोघ्यांचे मित्र अजित सोमण, अरुण नूलकर, सुहास तांबे, संजय पंडित ह्या आणि अनेक मित्रांनी निरपेक्षपणे मदत केली. कुणीच पैशासाठी हपापलेलं नसायचं. तो काळच वेगळा होता. सगळ्यांचंच पहिलं प्रेम कलेवरच होतं.

आज मोघे नाहीत त्यामुळे ह्या आठवणींनी मनाला विलक्षण हुरहुर वाटते आहे. त्यांनी सहजपणे केलेल्या संस्काराची शिदोरी मला जन्मभर पुरली. 'कविता कविता कविता' हा माझ्या आयुष्यातला अविस्मरणीय अनुभव तर आहेच, पण माझं अवघं जीवन उजळवून टाकणारा आहे.

**मानसी मागीकर**

९८८११२२५८८

# राजहंसी मोहोर : ऑडिओ पॉडकास्ट

**नंदीघोष यात्रा - श्रीकृष्णकथा : वेध नवा** - सतीश मुटाटकर

कृष्ण हे कालातीत प्रेरणास्थान आहे. त्याच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून देणारं 'नंदीघोष यात्रा- श्रीकृष्णकथा : वेध नवा' हे पुस्तक हे नुकतंच दाखल झालं आहे. हे पुस्तक सतीश मुटाटकर अणि यशवंत मराठे यांनी लिहिलं असून पुस्तकाचा अनुवाद डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके यांनी केला आहे.

**'गाता रहे'** - Book Review - Suhas Kirloskar

संगीत मग ते जुनं असो वा नवं, शास्त्रीय-उपशास्त्रीय असो वा चित्रपटसंगीत ते आवडीनं ऐकणारे आपल्यासह आजूबाजूला अनेक जण दिसतात. पण गीताचा-संगीताचा आस्वाद घेत आपण खरंच ते ऐकतो का? काय म्हणता? हा आस्वाद नेमका कसा घ्यायचा? सुहास किर्लोस्करलिखित 'गाता रहे' हे पुस्तक चित्रपटसंगीताची अन् वाद्यसंगीताच्या आस्वादाची अनोखी मैफील साकारतं. अल्पावधीतच दुसरी आवृत्ती येत असलेल्या गाता रहेविषयी जाणून घेऊ या या एपिसोडमध्ये.

**शह आणि काटशह** - डॉ. राजीव जोशी

वैद्यकीय क्षेत्र हे त्यातल्या कामच्या तासांमुळे, इमर्जन्सी केसेसमुळे कमालीचं धकाधकीचं तर असतंच पण ते तितकंच स्पर्धेचं आणि चुरशीचंही असतं. ही चुरस वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवण्यापासूनच सुरू होते. डॉ. राजीव जोशीलिखित 'शह आणि काटशह' हे पुस्तक १९८७ साली घडलेली अशीच एक सत्यकथा उलगडते. ही कथा आहे वैद्यकीय प्रवेशांमध्ये होणाऱ्या गोंधळाची, त्याविरुद्ध आवाज उठवणाऱ्या लढ्याची, प्रशासन, विद्यार्थी-पालक अन् वृत्तपत्रे यांनी एकमेकांवर आणि न्याययंत्रणेवर टाकलेल्या डावपेचांची. वैद्यकीय क्षेत्राची सामान्यांना अपरिचित अशी ही बाजू उलगडणाऱ्या या पुस्तकाविषयी जाणून घेऊ या या एपिसोडमध्ये.

**ऐवज विचारांचा -** स. ह. देशपांडे जन्मशताब्दी विशेष

भोवतालच्या समाजाचे आणि सामाजिक परिस्थितीचे एका समाजशास्त्रज्ञाच्या चश्म्यातून सतत आकलन करून घेणारे प्रा. स. ह. देशपांडे हे वैचारिक महाराष्ट्राला परिचित असणारे एक नाव. प्राध्यापक देशपांडे यांनी पाच दशकांहूनही अधिक काळ विपुल लेखन केले आणि महाराष्ट्राच्या विचार-विश्वावर एक विशिष्ट ठसा उमटवला. राष्ट्रवाद या विषयाचे त्यांचे लिखाण हे अनेक मान्यवरांकडून व व्यासपीठांवरून चर्चिले गेले. प्रा. स. ह. देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष सरत असताना त्यांच्या निवडक लेखांचा संग्रह असलेले 'ऐवज विचारांचा' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

**Kishor Kumar Life Journey and Songs -** Suhas Kirloskar

हिंदी चित्रपटसृष्टीतलं उत्स्फूर्त संगीताचा आविष्कार असणारं हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व म्हणजे किशोर कुमार. एक मनस्वी हळवा माणूस लपला होता त्याच्यात. 'आ चल के तुझे मैं ले के चलूं' गाण्याचा गीतकार किशोर...'कोई हमदम न रहा' गाण्याचा संगीतकार होता. 'मैं हुं झुम झुम झुमरू' गाणारा किशोर...'दुखी मन मेरे'सारखी दर्दभरी गाणी तितक्याच तन्मयतेनं गायचा. या पुस्तकात रसिक कला आस्वादक सुहास किर्लोस्कर आपल्याला सांगताहेत किशोर कुमार नावाच्या अष्टपैलू गायकाबद्दल. कसा होता किशोर गायक म्हणून? काय होत्या त्याच्या खासियती? सिनेसृष्टीत त्याला कसं झगडावं लागलं? या रसदार कथनानंतर वाचायला मिळतील किशोरची निवडक पंचवीस गीतं आणि त्यांचं रसग्रहण...

**साठवणीतील गाणी** - लता मंगेशकर । आशा भोसले । मोहंमद रफी । किशोर कुमार

स्वातंत्र्योत्तर काळात हिंदी चित्रपटसृष्टीचं जे सुवर्णयुग अवतरलं त्यात चित्रपटसंगीताचा मोलाचा वाटा होता. या सुवर्णकाळातील चार लखलखती नक्षत्रं म्हणजे लता मंगेशकर, मोहम्मद रफी, आशा भोसले आणि किशोर कुमार. या चार गायकांच्या कारकिर्दीचा आढावा घेत त्यांनी गायलेल्या हजारो गाण्यांपैकी प्रत्येकी २५ गाण्यांचा रसास्वाद घेणारी सुहास किर्लोस्कर आणि डॉ. मृदुला दाढे लिखित चार नवीन पुस्तकं साठवणीतील गाणी या मालिकेअंतर्गत नुकतीच राजहंसनं प्रकाशित केली आहेत.

**धरणसूक्त** - विलास शेळके

एखादा धरणप्रकल्प साकार होताना नेमकं काय घडतं? त्या ठिकाणी तज्ज्ञ इंजिनीयरांपासून रोजंदारीवरच्या मजुरांपर्यंत शेकडो माणसं कसा हातभार लावतात? या सगळ्यांच्या एकत्र जगण्यातून कोणतं जीवननाट्य उलगडत जातं? विस्थापितांना कोणत्या मरणयातनांना सामोरं जावं लागतं? धरणउभारणीत किती व्यामिश्र तांत्रिक बाबी गुंतलेल्या असतात? एकापाठोपाठ एक महत्त्वपूर्ण धरणांची उभारणी करणाऱ्या एका कुशल इंजिनीयरच्या नजरेतून धरणप्रकल्पाशी नाळ जोडलेल्या एका आगळ्यावेगळ्या जगाचा अन् संस्कृतीचा वेध घेणारी ही अनोखी कादंबरी.

**Lata Mangeshkar Vishesh -** Dr. Mrudula Dadhe

संगीत हे परमेश्वरापर्यंत पोहोचायचं साधन असेल, तर त्या प्रवासाला स्वत:च्या आवाजाचा मखमली रस्ता दिला, तो लताबाईंनी. राग, अनुराग, प्रणय, मीलन, विरह, रुसवा, वंचना, निराशा, पश्चात्ताप, वात्सल्य, हर्ष, खेद... अशा अनंत भावच्छटांना लताच्या आवाजानं मूर्तरूप दिलं. या दैवी आवाजाची ना कुणाला व्याख्या करता आली, ना तो संगीताच्या कुठल्या गणिती मोजपट्टीत किंवा व्याकरणात बसवता आला. त्या अपूर्व स्वरलेण्याला ही विनम्र आदरांजली, लताबाईंच्याच निवडक पंचवीस गीतांच्या शब्द-सूर-अर्थ-आस्वादाच्या साथीने...

**Madhav Gadgil Vishesh -** Special Interaction

पद्मभूषण माधव गाडगीळ म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व! निसर्गप्रेम हा माधव गाडगीळांचा श्वास अन् ध्यास. गेल्या पाच तपांचे सखोल संशोधन, भारतातील निसर्गाची अन् जीवशास्त्राची अद्‌भुत कोडी सोडवणारा प्रदीर्घ व्यासंग आणि सामान्यातल्या सामान्य माणसाप्रति मानत असलेले उत्तरदायित्व या साऱ्यांचे विलक्षण मिश्रण म्हणजे माधव गाडगीळ. त्यांना संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरणविषयक विभागाने नुकतेच 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' या पुरस्काराने सन्मानित केले आहे. या विशेष निमित्ताने या ज्येष्ठ निसर्गवैज्ञानिकाशी संवाद साधताहेत शास्त्रज्ञ-संशोधक डॉ. मंदार दातार...

**Madhav Gadgil Vishesh** - Part 2

पद्मभूषण माधव गाडगीळ यांच्याशी शास्त्रज्ञ-संशोधन डॉ. मंदार दातार हे संवाद साधताहेत. निमित्त आहे संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरणविषयक विभागानं नुकतंच Champions of The Earth या पुरस्कारानं माधव गाडगीळ सरांना सन्मानित केलंय. या विशेष भागाचा हा उत्तरार्ध...

**माणूस असा का वागतो?** - अंजली चिपलकट्टी

नैतिकता अन् सामाजिक विषमता, धर्मभावना आणि आध्यात्मिकता, प्रेम अन् लैंगिकता, आक्रमकता अन् भय, अनुपालन, धर्म-जात भेदाभेद, कल्पनाविश्व अन् साहित्य-कला-क्रीडा... माणसाच्या वर्तनाचे असे अनेकविध पैलू. माणसांना एकमेकांशी बांधणारी तत्त्वं माणसाच्या वर्तनात उत्क्रांतीनंच पेरली आहेत का? मानवी वर्तनाला विधायक वळण देण्याची अंगभूत क्षमता माणसातच आहे का? अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरांचा मागोवा घेणारं - आजच्या सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थितीशी नानाविध ज्ञानशाखांच्या एकात्मिक अभ्यासाचा संबंध जोडत माणसाच्या व्यक्तिगत अन् सामूहिक वर्तनाचा वैज्ञानिक वेध घेणारं पुस्तक - 'माणूस असा का वागतो?'

**पाकिस्तान का मतलब क्या?** - श्रीधर लोणी

पाऊणशे वर्षांचा टप्पा ओलांडल्यानंतरही एखाद्या देशाला आपल्या अस्तित्वाच्या अर्थाचा प्रश्न पडावा का? पण पाकिस्तानला तो पडतोय. 'पाकिस्तान का मतलब क्या?' हा प्रश्न आजही तेथे विचारला जातो. उत्तरासाठी इस्लामचा आधार घेतला जातो; मात्र तेथेही उत्तर मिळत नसल्यानं कडवा भारतविरोध जोपासला जातो. धार्मिक ओळख कमी करावी तर वेगळेपण काय राहील याची भीती आणि भारतविरोधाची धार सौम्य करावी, तर मग भारतापासून वेगळे का झालो हा प्रश्न. अस्मितेच्या वावटळीत फसलेल्या या देशाच्या आजवरचा प्रवासाचा वेध म्हणजे श्रीधर लोणी लिखित 'पाकिस्तान का मतलब क्या?' हे पुस्तक.

**मराठी भाषा गौरव दिनाची राजहंसी भेट!** - डॉ. सदानंद बोरसे

३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षं प्राचीन असायला हवी. त्या भाषेत समृद्ध ग्रंथ आणि साहित्यपरंपरा असावी. हे साहित्य मूळ त्याच भाषेत लिहिलेलं असावं. अनुवादित नसावं. भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नातं सुस्पष्ट असावं असे हे निकष आहेत. या पार्श्वभूमीवर यंदाचा 'मराठी भाषा गौरव दिन' विशेष ठरणार आहे. या निमित्तानं राजहंस प्रकाशनाच्या मराठी साहित्यातील योगदानाविषयी राजहंस प्रकाशनाचे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांच्याशी साधलेला हा विशेष संवाद.

**So Cool Take 2** - Sonali Kulkarni

Renowned actress and author Sonali Kulkarni talks extensively about her love for writing and how she crafted the book 'So Cool Take 2' in this special podcast with veteran journalist and editor of her book Alhad Godbole.

**What's the Future of Audio Podcasts in the wave of Video?**

न्यू मीडिया अर्थात नवीन माध्यमांचा विचार करता पॉडकास्टिंगनं गेल्या चार-पाच वर्षांत स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. विश्वसंवाद हा मराठीतला पहिला पॉडकास्ट हा अमेरिकास्थित सॉफ्टवेअर व्यावसायिक मंदार कुलकर्णी यांनी २०१७मध्ये सुरू केला. गेल्या आठ वर्षांत विश्वसंवाद पॉडकास्टवर येऊन काही पाहुण्यांशी झालेल्या गप्पांवर आधारित 'निवडक विश्वसंवाद' हे पुस्तक राजहंसनं प्रकाशित केलं आहे. पॉडकास्ट ते पुस्तक अशा माध्यमांतराचंही मराठीतलं पहिलंच उदाहरण ठरलेल्या या पुस्तकाविषयी जाणून घेऊ या या एपिसोडमध्ये.

**नागरिकत्व दुरुस्ती कायदा, घटनात्मकता व वास्तवता** - शेषराव मोरे

आपल्या संविधानाची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक' अशी आहे. भारतीय नागरिकत्वाचा मूळ कायदा काय आहे तसंच भारताच्या सहा शेजारी देशांमधील ठरावीक व्यक्तींना भारताचं नागरिकत्व ज्या कायद्यानं मिळू शकतं, नवीन कायदा नेमका कसा आहे, हे जाणून घेणं महत्त्वाचं ठरतं. या कायद्याच्या विविध पैलूंचा वेध घेणारं शेषराव मोरेलिखित

‘नागरिकत्व दुरुस्ती कायदा घटनात्मकता व वास्तवता’ हे नवीन पुस्तक नुकतंच प्रकाशित झालंय.

**Mohammad Rafi Vishesh** - Dr Mrudula Dadhe

मोहम्मद रफींचं नाव घेतलं अन् त्यांची एकाहून एक सरस नि सुरस गाणी आठवली की सद्‌गुणांना सुगंधी स्वर लाभला होता असं वाटल्याशिवाय राहत नाही! पुरुषी स्वर, पण त्याला होती जितकी ऐट तितकीच अदब..प्रेम, छेडछाड, प्रेमभंग, विफलता, उद्वेग, नटखटपणा, शुद्ध भक्ती आणि अशा असंख्य भावच्छटा, रफी-स्वरातून सारख्याच सहजपणे नि कुशलतेनं उमटल्या... रसिकांना नाना रसांच्या वर्षावात आजपर्यंत चिंब भिजवत राहिल्या. म्हणून तर रफी ठरले नवरसांचे जादूगार! संगीताच्या जाणकार नि प्रसिद्ध गायिका डॉ. मृदुला दाढे या पुस्तकात सांगतायत, रफींच्या आवाजातल्या जादूचं रहस्य! अन् त्यानंतर आहेत रफींची निवडक पंचवीस गाणी आणि त्यांचं रेशमी रसग्रहण...

**समलैंगिकतेचं समग्र चित्रण** - Apule Apan

आपल्या समाजात काही विषयांवर बोलणं-व्यक्त होणं निषिद्ध समजलं जातं. समलैंगिकता हा असाच एक विषय. समलैंगिकता ही नैसर्गिक आणि अगदी स्वाभाविक गोष्ट असली तरी याविषयी कमालीचं अज्ञान आणि गैरसमज आहेत. जैत लिखित ‘आपुले आपण’ हे पुस्तक समलैंगिकतेविषयी वास्तवदर्शी विवेचन करतं. या आगळ्यावेगळ्या पुस्तकाविषयी जाणून घेऊ या या भागात...

**शिवरायांचं कार्य कॉर्पोरेटलाही प्रेरणादायी** - Dr. Ajit Apte

छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्यसंस्थापक होते, मुत्सद्दी राजकारणी होते आणि धुरंधर सेनानी होते. याबरोबरच ते कुशल प्रशासक होते, अर्थतज्ज्ञ होते आणि मानवी संसाधनांची प्रभावी योजना करणारे व्यवस्थापकही होते. शिवरायांच्या कुशल प्रशासनाची, प्रभावी व्यवस्थापनाची आणि यशस्वी अर्थकारणाची अभ्यासू मांडणी म्हणजे डॉ. अजित वामन आपटेलिखित ‘श्रीशिवराय IAS ?’, ‘श्रीशिवराय MBA Finance ?’ आणि ‘श्रीशिवराय VP HRD ?’ या तीन पुस्तकांचा संच. या आगळ्यावेगळ्या पुस्तकांविषयी जाणून घेऊ या या एपिसोडमध्ये.

**‘६४ घरांच्या गोष्टी’** - रघुनंदन गोखले

तुम्हाला बुद्धिबळ खेळायला आवडत असेल, तर तुम्ही या पुस्तकाच्या नक्की प्रेमात पडाल! तुम्हाला बुद्धिबळाबद्दल फारशी जाण नसेल, तर मात्र तुम्ही हे पुस्तक वाचायलाच हवे! बुद्धिबळाच्या इतिहासातील अज्ञात वळणांचा, खेळाडूंच्या अप्रतिम कर्तृत्वाचा, अगदी चित्रपटातून दिसलेल्या बुद्धिबळक्षेत्राचा मागोवा घेत हे पुस्तक बुद्धिबळाच्या जगाची एक रोचक सफर घडवते. बॉबी फिशर, विश्वनाथन आनंद, मॅग्नस कार्लसनपासून गुकेश, हंपीपर्यंत नानाविध खेळाडूंची भेट घडवणाऱ्या रघुनंदन गोखलेलिखित ६४ घरांच्या गोष्टी या पुस्तकाविषयी जाणून घेऊ या या एपिसोडमध्ये.

**वाचाल तर समृद्ध व्हाल, पण कसं?** - World Reading Day Special

In this special episode, author Sanjay Bhaskar Joshi explains why reading is important, how to read, and the abundant benefits of being an avid reader.

**शेक्सपिअरला आठवताना** - World Shakespeare Day Special

दरवर्षी २३ एप्रिल हा दिवस ‘जागतिक शेक्सपिअर दिन’ म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने राजहंस प्रकाशनाचे संपादक आणि शेक्सपिअरच्या साहित्याचे अभ्यासक शिरीष सहस्रबुद्धे यांनी शेक्सपिअरच्या कलाकृतींचे, त्याच्या साहित्याचे केलेले हे सखोल विश्लेषण...

**भारतद्वेषाची पाकिस्तानी गोष्ट** - Pahalgam Terrorist Attack

पाकिस्तानी लष्करप्रमुख असिम मुनिर यांनी पहलगामच्या दहशतवादी हल्ल्याच्या पाचच दिवस आधी अनिवासी पाकिस्तानींसमोर एक मोठं भाषण केलं होतं. त्यात त्यांनी पाकिस्तानची गोष्ट पुढच्या पिढ्यांवर बिंबवण्याचं आवाहन केलं होतं. ही पाकिस्तानी गोष्ट नेमकी काय आहे आणि त्या गोष्टीत सांगितलेली उक्ती दहशतवाद्यांनी पहलगामच्या हल्ल्यात कृतीत उतरवली का, याविषयी सांगताहेत ज्येष्ठ पत्रकार आणि ‘पाकिस्तान का मतलब क्या?’ या पुस्तकाचे लेखक श्रीधर लोणी.

**भारत पाकवर सर्जिकल स्ट्राईक करेल?** - War Against Terrorism

२२ एप्रिल २०२५ रोजी अतिरेक्यांनी पहलगाममध्ये २६ पर्यटकांची नृशंस हत्या केल्यावर पाकिस्तानवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सैन्यदलांना कारवाईचे दिलेले पूर्णाधिकार तर दुसरीकडे भारत पाकवर हल्ला करणार असल्याचं पक्कं इंटेलिजन्स असल्याचं पाकिस्तानी संरक्षणमंत्र्यांचं वक्तव्य या सगळ्यातून भारत-पाक युद्ध अटळ आहे की २०१६ आणि २०१९प्रमाणे भारत पाकिस्तानवर सर्जिकल किंवा एअर स्ट्राईक करेल हे प्रश्न निर्माण होत आहेत.

**छोट्यांचा मोठा प्लॅन** - Children Stories Special

मे महिन्याच्या सुट्टीत राजहंस प्रकाशन खास मुलांसाठी ऑडिओ स्टोरीजचा हा अनोखा खजिना घेऊन आलंय. मुग्धा शेवाळकरलिखित 'छोट्यांचा मोठा प्लॅन' ही गोष्ट चौथीतल्या गार्गी वैद्य हिनं वाचलीय. ही गोष्ट आवडली का हे आम्हाला या गोष्टीला लाईक, कमेंट करून नक्की कळवा! सुट्टीत दर मंगळवारी आणि शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता मुलांनीच मुलांसाठी वाचलेल्या या धमाल गोष्टी रिलीज होणार आहेत.

**कहाणी एका आधुनिक सुश्रुताची!** - डॉ. शैलेश पुणतांबेकर, डॉ. चित्रलेखा पुरंदरे

ही कहाणी आहे एका आधुनिक सुश्रुताची. सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या चतुरस्र कार्याची. असंख्य कॅन्सररुग्णांवर यशस्वी उपचार करणारे, जगभरातील अनेक देशांमध्ये जाऊन शल्यचिकित्साविषयक मार्गदर्शन आणि शस्त्रक्रिया करणारे, पुणे टेक्निक हे नवे शल्यतंत्र विकसित करणारे, ख्यातनाम सर्जन डॉ. शैलेश पुणतांबेकर यांच्या अनोख्या प्रवासाचा घेतलेला हा वेध.

**कोल्होबाची युक्ती** - Children Stories

मे महिन्याच्या सुट्टीत राजहंस प्रकाशन खास मुलांसाठी ऑडिओ स्टोरीजचा हा अनोखा खजिना घेऊन आलंय. समाधान शिकेतोडलिखित 'कोल्होबाची युक्ती' ही गोष्ट सहावीतल्या शर्व कुलकर्णी यानं वाचलीय. ही गोष्ट आवडली का, हे आम्हाला या गोष्टीला लाईक, कमेंट करून नक्की कळवा! सुट्टीत दर मंगळवारी आणि शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता मुलांनीच मुलांसाठी वाचलेल्या या धमाल गोष्टी रिलीज होणार आहेत.

**अबोली** - Children Stories

मे महिन्याच्या सुट्टीत राजहंस प्रकाशन खास मुलांसाठी ऑडिओ स्टोरीजचा हा अनोखा खजिना घेऊन आलंय. मुग्धा शेवाळकरलिखित 'अबोली' ही गोष्ट मीरा दांडेकर हिनं वाचलीय. ही गोष्ट आवडली का, हे आम्हाला या गोष्टीला लाईक, कमेंट करून नक्की कळवा! सुट्टीत दर मंगळवारी आणि शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता मुलांनीच मुलांसाठी वाचलेल्या या धमाल गोष्टी रिलीज होणार आहेत.

**पेरूची पार्टी** - Children Stories

मे महिन्याच्या सुट्टीत राजहंस प्रकाशन खास मुलांसाठी ऑडिओ स्टोरीजचा हा अनोखा खजिना घेऊन आलंय. संजीवनी बोकीललिखित पेरूची पार्टी ही गोष्ट आयुष जोशी यानं वाचलीय. ही गोष्ट आवडली का, हे आम्हाला या गोष्टीला लाईक, कमेंट करून नक्की कळवा! सुट्टीत दर मंगळवारी आणि शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता मुलांनीच मुलांसाठी वाचलेल्या या धमाल गोष्टी रिलीज होणार आहेत.

**चिरतरुण स्वर : आशा भोसले** - सुहास किर्लोस्कर

आशा भोसले हे नाव आठवण करून देतं, श्रावणातल्या इंद्रधनुष्याची... गाण्याचं असं एकही अंग नाही, ज्याला आशाताईंच्या सुरेल गळ्याचा परिसस्पर्श झाला नाही... या पुस्तकात रसिक संगीत अभ्यासक सुहास किर्लोस्कर आपल्याला घेऊन जातायत आशाताईंच्या गानखजिन्यात! आशाताईंच्या गायनकलेच्या जादूचा परिचय आणि मग त्यांची निवडक पंचवीस हिंदी-मराठी गाणी आणि त्यांचा रसास्वाद... चुकवू नये अशी मैफल...

**चला, पाणी अडवू या** - Children Stories

मे महिन्याच्या सुट्टीत राजहंस प्रकाशन खास मुलांसाठी ऑडिओ स्टोरीजचा हा अनोखा खजिना घेऊन आलंय. समाधान शिकेतोडलिखित 'चला पाणी अडवू या' ही गोष्ट कनिका भोसले हिनं वाचलीय. ही गोष्ट आवडली का, हे आम्हाला या गोष्टीला लाईक, कमेंट करून नक्की कळवा! सुट्टीत दर मंगळवारी आणि शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता मुलांनीच मुलांसाठी वाचलेल्या या धमाल गोष्टी रिलीज होणार आहेत.

**देहभान - लैंगिकता संवाद का महत्त्वाचा?** - निरंजन मेढेकर

मानवी नात्यांमधला लैंगिकता हा मूलभूत पैलू. आजची तरुणाई त्याकडे कशी बरं बघते? उत्तम सहजीवनासाठी नेमकं काय करायला हवं? विवाहपूर्व लैंगिक समुपदेशन का हवं? सुखी संसाराचं गुपित काय? बदलत्या जीवनशैलीमुळे लैंगिकतेवर परिणाम झाले आहेत का? ते कोणते? त्या समस्यांना कसं तोंड द्यायचं? ज्येष्ठांचं सहजीवन हा दुर्लक्षित राहिलेला विषय. त्याचं महत्त्व काय? हे आणि असे अनेक प्रश्न... सर्व वयोगटाला पडणारे... ते कोणाला विचारायचे? या प्रश्नांची शास्त्रीय पद्धतीनं उत्तरं देणारं पुस्तक... 'देहभान'.



ही आहेत कवीची स्वगतं! या आहेत जगण्यातल्या विरामचिन्हांच्या काव्यात्म नोंदी अन् आटलेल्या मायेच्या स्मृती. जगण्यातील शुष्कतेला ओल देणारा हा प्रार्थनाशील सूर... हृदयातून ऐकावा असा...

## छतं गळोत

श्रीधर देशपांडे

किंमत : ₹ १६०/- । (ट.ख. ₹ ५०)

हे पुस्तक आहे... सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पृथ्वीच्या अंतरंगाविषयीचं! तिच्या आजतागायत सुरू असलेल्या बदलांच्या आणि त्याला कारणीभूत असलेल्या घटकांच्या रंजक आणि सुबोध पद्धतीनं केलेल्या शास्त्रीय मांडणीचं...! तेव्हा जरूर वाचा...

## शोध बदलत्या पृथ्वीचा

सतत बदलत्या भूगर्भीय घडामोडींचा वेध

सुनीत पोतनीस

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)



## डॉ. जयंत नारळीकर यांची ‘राजहंसी’ पुस्तके



आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या प्रतिभाविलासातून फुललेल्या या पाच विज्ञान कादंबऱ्या वाचकाला जणू कालयंत्रातून भूत-भविष्य-वर्तमानाची सफर घडवतात...

### समग्र जयंत नारळीकर

डॉ. जयंत नारळीकर

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)



डॉ. नारळीकरांचे एक रूप आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या खगोलशास्त्रज्ञाचे, तर दुसरे रूप किशोरवयीन मुलामुलींना विज्ञानातील संकल्पना हसतखेळत शिकवणाऱ्या आणि विविध कथांमधून त्यांना रमवत, रिझवत अनोख्या जगाची सफर घडवणाऱ्या विज्ञानलेखकाचे. त्यांच्या प्रतिभाविलासातून उमललेल्या सात बहुरंगी कथांचे इंद्रजाल.

### मायाजाल

डॉ. जयंत नारळीकर

किंमत : ₹ ११०/- । (ट.ख. ₹ ५०)



प्रत्येकाच्या मनात कधी ना कधी उमटलेल्या खगोलविषयक प्रश्नांची शास्त्रीय अन् तर्कशुद्ध उत्तरे. जागतिक दर्जाचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उमटलेल्या मूळ हिंदी पुस्तकाचा सुबोध, रसाळ मराठी अनुवाद.

### ताऱ्यांची जीवनगाथा

डॉ. जयंत नारळीकर । अनुवाद : डॉ. पुष्पा खरे

किंमत : ₹ १४०/- । (ट.ख. ₹ ४०)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## विस्मय

जाग येता विश्व अवघे
अंतरी कवटाळतो,
दिवस माझ्या सोबतीला
रात्र दुरुनी सावरी

कोवळी किरणे पसरती
रोज माझ्या अंगणी,
मोकळे आकाश निळे
पाहतो आनंदुनी

बदललेले रूप तुझे
विस्मयाने पाहतो,
आज दाहकता असू दे
गारवा शिडकावतो

हिरवळीच्या दोन बाजू
उतरताना संपल्या,
मार्ग पुढचा अडचणींचा
खडक वाटेवर उभा

मैत्रीचे ते दिवस माझे
सोबतीला वादळे
रौद्ररूपी सागराला
मन:पूर्वक पूजितो

**राजीवलोचन पुंडलीक**
९९२३७५६६४८

## ‘राजहंसी’ विविधा



निसर्ग हा एक अद्भुत खजिना आहे. अक्षरश: लाखो प्रकारचे सजीव निसर्गात आहेत. हे सजीव आणि त्यांचा परिसर यांची अनेक गुपिते आपल्याला ठाऊक नसतात. ती माहीत करून घेण्यासाठी वाचू या..

### निसर्ग गुपिते

डॉ. संदीप श्रोत्री

किंमत : ₹ ६०/- । (ट.ख. ₹ ५०)

निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार,
मानवी स्वभावातील भावनाट्य,
कवितेचा रुणझुणता चरण
यावरील आत्मचिंतनातून आलेले लेख

### गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)





साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे केवळ साक्षी नव्हे, तर निरनिराळ्या नात्यांनी प्रत्यक्ष सहभागी असलेले प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे यांनी अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.

### समांतर रंगभूमी : पल्याड-अल्याड

पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा मागोवा

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

## चीनची जडणघडण

*हे पुस्तक ललित-लेखांचं संकलन आहे. चिंतनशील, प्रेरक, मार्गदर्शक विचारांचे आरसे लेखकानं वाचकांपुढे उभे केले आहेत. त्यात रसरशीत चैतन्यमयी लालित्य आहे. लेखकाला काव्याची आवड असल्यानं अधूनमधून झिरपणाऱ्या काव्यपंक्तींच्या झऱ्यांनी हे लेख समृद्ध झाले आहेत.*

चीनच्या साम्यवादी राज्यक्रांतीला ७५ वर्षे झाली. हा सगळा थक्क करणारा प्रवास आहे. चीनचा ड्रॅगन झोपलेला आहे; पण तो जागा झाला, तर सगळ्यांची झोप उडवेल असे कुणा राजनीतितज्ज्ञाने म्हटले होते ते आठवले. आम्हाला चीनची जाणीव झाली ती 'हिंदी चिनी भाई भाई' म्हणत आमच्या पाठीत त्याने खंजीर खुपसला तेव्हा.

त्यानंतर काही वर्षांनी वि. ग. कानिटकरकृत 'माओ क्रांतीचे चित्र आणि चरित्र' आल्याने चीनच्या पोलादी पडद्याच्या मागे काय काय घडलेय व दडलेय याची पुसटशी कल्पना आली. त्यानंतर अरुण साधू यांनी 'आणि ड्रॅगन जागा झाला' या पुस्तकात चीनचा आणखी पुढचा थोडा इतिहास सांगितला. आणखी दोन-चार पुस्तके चीनविषयक असतील नसतील, पण चीनची वाटचाल इतक्या भयंकर वेगाने झाली, की त्या राष्ट्रात तीन क्रांती झाल्या. रक्तरंजित क्रांती झाल्या. त्यापासून ते महासत्तेपर्यंत पोहोचण्याची, इतरांना जरब वाटण्याइतकीच नव्हे, तर दहशत वाटावी इतकी वाटचाल या राष्ट्राने कशी कशी केली असेल, ही कुतूहल वाटणारी गोष्ट आहे. त्या जिज्ञासेतून गिरीश कुबेर यांनी या प्रश्नाचा धांडोळा घेतला. त्याचा इतिवृत्तान्त म्हणजेच 'मेड इन चायना - दुबळा देश ते महासत्तापद : एक आश्चर्यकारक प्रवास' हा ग्रंथ.

याबाबत कुबेर म्हणतात, 'चीनचा विषय निघाला की, तो रंगीबेरंगी आणि अक्राळविक्राळ ड्रॅगन, माओ इत्यादींचं लालरंगी वर्णन यापलीकडे मराठीतलं लिखाण फार काही जात नाही. ही प्रतीकात्मता चीन समजून घेण्यातली आणि देऊ पाहणाऱ्यांची मर्यादा आहे. वास्तविक आजचा चीन आणि माओ यांचा दुरान्वयेही संबंध नाही. चीनचं वास्तव हे ऑर्वेलियन सत्य आहे. म्हणजे जे प्रत्यक्षात नाही, त्याचं

गुणगान गायचं आणि जे काही आहे, त्याबाबत अवाक्षरही काढायचं नाही. आजचा चीन नियंत्रित भांडवलशाही (कंट्रोल्ड कॅपिटॅलिजम) आहे, पण चीन नाव लावतो साम्यवादाचं. हेच ते चीनचं 'मेड इन चायना' प्रारूप आणि ते जमेल तितकं समजावून सांगावं हा या पुस्तकातील विचार.'

चीनच्या प्राचीन इतिहासापासून सुरुवात करत कुबेर तो धागा आताचा शास्ता शि जिनपिंग यांच्या इतिहासापर्यंत आणून दाखवतात. त्यामध्ये ते परिचित, अपरिचित अनेक गोष्टी सांगतात जसे की 'स्थानिक चिनी हे बर्ट्रांड रसेल यांना कन्फुशियसचा अवतार मानत होते.' आजदेखील कन्फुशियसच्या विचारांचा पगडा चीनच्या धोरणात दिसून येतो. त्यावरची कुबेरी टिप्पणी आहे, 'चीन असा का वागतो हे समजून घ्यायचं असेल, तर आधी कन्फुशियस लक्षात घ्यायचा असं म्हणतात ते यासाठी.'

इसवी सनपूर्व काळापासून ते आजपर्यंतचा कालखंड, त्यातील सम्राट भले नंतर त्यांची पदांची नावे वेगवेगळी झाली त्याची यथासांग दखल कुबेर यांनी घेतलेली आहे त्यात एक नोंद आहे एकमेव एका सम्राज्ञीची, पण बाकी त्याबाबत कुबेर काहीच सांगत नाहीत ही सम्राज्ञी म्हणजे वू झावो (६२४ ते ७०५). ती वू झेटियन म्हणूनही ओळखली जाते. तिच्या प्रकांड बुद्धिमत्तेमुळे आणि महत्त्वाकांक्षेला राजकीय योग्य समज असल्यामुळे तिने दुसऱ्या झाओ राजवंशाच्या (६९० ते ७०५) पवित्र आणि दैवी सम्राट म्हणून सत्ता गाजवली. त्याच वेळी चिनी नौदलात एके काळी झेंगसारखे ॲडमिरल होते हे सांगताना कुबेर नोंदवतात, 'त्या काळी चिनी नौदलात अनेक तृतीयपंथी विविध उच्च पदांवर होते. झेंग हे त्यातले सर्वोच्च.'

माओपासून ते आजच्या शि जिनपिंग या सर्व सत्ताधाऱ्यांचा लेखाजोखा कुबेर मांडतात. त्या रक्तरंजित कहाण्या पाहून तरी चीन महासत्तेकडे कशी झेप घेतो हे पाहून अचंबित व्हायला होतं. तसेच जगाच्या नजरेत चीनची प्रतिमा उंचावण्यासाठी




चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा-
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना इतिहासात
दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात. हे चकित
करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं-

## मेड इन चायना

गिरीश कुबेर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/- (ट.ख.₹ ५०) । (हार्डबाऊंड)

ऑलिंपिक स्पर्धेचे केलेले आयोजन, त्यासाठी केलेली तयारी पाहून चीन राष्ट्र म्हणून कसे भरभक्कम आहे याची कल्पना येते. सत्तेसाठी चीनमध्ये एकमेकांमध्ये अंदाधुंद साठमारी दिसते, पण सगळ्या राज्यकर्त्यांच्या पॉलिसीमध्ये, धोरणामध्ये एक गोष्ट कायम दिसते, ज्याला आपण त्यांचा लघुत्तम साधारण विशेष म्हणू शकतो. तो म्हणजे राजकारणी शि यांनी दिलेला-केलेला एल्गार. 'मेक चायना ग्रेट अगेन!'

थोडक्यात 'मेड इन चायना' म्हणजे चीनने निर्माण केलेला चक्रव्यूह आहे. ते एक आव्हानच आहे. म्हणून गिरीश कुबेर यांच्या शब्दांत या आव्हानाचा परिचय व्हावा, आकार व उकार लक्षात यावा हा या पुस्तकाचा हेतू.

सदर पुस्तकाने हे साध्य झाले आहे.

**रविप्रकाश कुलकर्णी**

(*सामना*, रविवार १३ एप्रिल २०२५)


मृत्यू समीप असतानाही जगावेगळा विचार करणाऱ्या व्यक्तींच्या या आहेत असामान्य जीवनस्पर्शी आणि वास्तवदर्शी कथा... यांतील प्रसंग, गूढता, ताणतणाव आणि दिलासा देणारा हळुवार स्पर्श वाचकांना मनभावन होईल.

सोबत सांजवेळची

डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी । अनु. : पद्मजा मेहेंदळे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

स्थलांतर करू पाहणाऱ्या पक्ष्यांच्या एका थव्याला प्रवासामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. एका टप्प्यावर प्रत्यक्ष नेत्याचे नीतिधैर्य संपते. नेताहीन थवा दिशाहीन होऊन विखुरतो, प्रवासात शिकून शहाणा होत असलेला एक लहान पक्षी त्याला धीर देतो. त्याची गोष्ट सांगणारे -

नंदनवन (संगीत-नृत्य-नाट्य)

माधव वझे

किंमत : ₹ ५०/- । (ट.ख. ₹ ५०)


# राजहंसी पार

## काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?

### ‘सीता’ कादंबरीवर आधारित व्याख्यान




डावीकडून नरेश सबजीवाले, शरद निंबाळकर, अभिराम भडकमकर, निलेश खांडेकर आणि डॉ. रवींद्र शोभणे

अभिराम भडकमकरलिखित ‘सीता’ या कादंबरीवर आधारित ‘कालजयी सीता’ हा कार्यक्रम नागपूरकरांनी नुकताच अनुभवला. राजहंस प्रकाशन, मंथन व्यासपीठ आणि विदर्भ गौरव प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ‘कालजयी सीता’ या विषयावरील व्याख्यानातून भडकमकर यांनी सीतेचे राजकीय व सामाजिक संदर्भ, प्रगल्भ व ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्व मांडले. ‘‘रामायण प्रत्येकाने आपापल्या पद्धतीने मांडले. याचा शोध घेताना ज्याला जसे बिंदू मिळत गेले तसे तो रेखाटत गेला. प्रत्येकाला ते आपल्या पद्धतीने मांडण्याचे स्वातंत्र्य या मातीने दिले. त्यामुळे ‘सीता’ या कादंबरीमध्ये तिच्या त्यागाच्या अनेक कथा आहेत. त्या आजच्या काळातही प्रासंगिक असून प्रेरणा देतात.’’ असे या प्रसंगी भडकमकर यांनी सांगितले.

सीतेविषयी मौलिक विचार मांडत असतानाच ते असेही म्हणाले की, ‘‘रामायण

म्हणजे केवळ राम आणि रावणामधील युद्ध नाही तर दोन संस्कृतींमधील संघर्ष आहे. मौखिक परंपरेने चालत आलेल्या गोष्टीने आपल्याला काय दिले याचा विचार केला तर देशातील धर्म, पंथ, जात, संस्कृती, परंपरा या सर्व विविधतेला रामकथेने एका धाग्यात बांधण्याचे काम केले. रामायणातील सीता ही दुबळी नाही, तर कणखर आणि चतुर आहे. राम हा एक विचार आहे आणि सीता रामराज्याचा कणा आहे.''

या कार्यक्रमास पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू शरद निंबाळकर, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## माणिक मोती : प्रकाशन सोहळा



डावीकडून शैला दातार, डॉ. चैतन्य कुंटे, शोभा बोंद्रे, सचिन पिळगावकर, आशिष शेलार, अच्युत गोडबोले, भारती आचरेकर, पं. विकास कशाळकर, वंदना गुप्ते, डॉ. सदानंद बोरसे, राणी वर्मा आणि अरुणा जयप्रकाश

''माणिक आणि अमर वर्मा यांना मी मम्मी-पप्पा म्हणायचो. त्यांच्या बाजूला बसून गप्पा मारणे माझ्या नशिबी होते. मम्मीने डाळीत तूप घालून खायला शिकवल्याने आजही माझे गाल गोबरे आहेत. मम्मी बरी व्हावी म्हणून माझी आई मला सिद्धिविनायक मंदिरात न्यायची आणि नवस बोलायची. अशी दैवी गायिका इंटरनेटच्या काळात आली नाही. ती आधी आली म्हणून अमर झाली.'' असे प्रतिपादन अभिनेते सचिन पिळगावकर यांनी केले.

ज्येष्ठ गायिका पद्मश्री माणिक वर्मा यांच्या 'माणिक मोती' या शोभा बोंद्रेलिखित चरित्रग्रंथाचे प्रकाशन दादरमधील स्वा. सावरकर सभागृहात करण्यात

आले. त्या वेळी अभिनेते सचिन पिळगावकर बोलत होते. माणिक वर्मा फाउंडेशन आणि महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने हा कार्यक्रम पार पडला.

''सात वाजता माणिक मोती आणि आठ वाजता नरेंद्र मोदी.'' अशी कोपरखळी मारत आशिष शेलार म्हणाले, ''माणिक वर्मा या नावातच अनेक पैलू दडले आहेत. त्यांचे जीवन म्हणजे व्यावहारिक आणि तात्त्विक विचारांचा संगम. त्या परिपूर्ण आयुष्य जगल्या. आईकडून संगीताची शिकवण मिळाल्यावर बाराव्या वर्षी त्यांची संगीताची मैफील रंगली आणि त्यांचे फुललेले बालपण या पुस्तकात दिसले. त्यांचा संघर्ष आणि गुरू-शिष्य परंपराही यात आहे.''

अच्युत गोडबोले, पं. विकास कशाळकर, डॉ. चैतन्य कुंटे, गायिका शैला दातार, राजहंस प्रकाशनाचे डॉ. सदानंद बोरसे आदी मान्यवर उपस्थित होते. राणी वर्मा, भारती आचरेकर, वंदना गुप्ते आणि अरुणा जयप्रकाश या माणिक यांच्या कन्याही हजर होत्या.

---

## संघातील मानवी व्यवस्थापन : प्रकाशन सोहळा

लोक आधी भारतावर विश्वास ठेवत नव्हते. परंतु, अलीकडच्या काही घडामोडींमधून क्षमता सिद्ध झाल्यामुळे लोक भारतावर विश्वास ठेवायला लागले आहेत. परिणामी, जगाचाही भारतावरील विश्वास वाढला आहे. भारत अशक्य ते शक्य करू शकतो, हे सर्वांना कळून चुकले आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचारप्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या 'संघातील मानवी व्यवस्थापन' या पुस्तकाचे शुक्रवारी आंबेकर आणि ज्येष्ठ संपादक व विचारवंत विवेक घळसासी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. हा कार्यक्रम राजहंस प्रकाशन व मंथन व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने गोरे पेठेतील वनामती सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता. व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनामध्ये चारित्र्याला खूप महत्त्व आहे. देशामध्ये आधी शुद्ध चारित्र्याचे लोक होते. त्यामुळे हा देश हजारो वर्षापर्यंत एकसंघ राहू शकला. म्हणूनच संघ चारित्र्यवान व्यक्ती निर्माण करण्याचे कार्य करतो. असे व्यक्तीच देशाला सर्वश्रेष्ठ बनवू शकतात. स्वत:च्या स्वार्थाचा विचार करणाऱ्यांमुळे परिवारच एकत्र राहू शकत नाही, देश व संघटना तर दूरची गोष्ट आहे, असेही आंबेकर या वेळी म्हणाले.

घळसासी यांनी वर्तमान राजकीय नेत्यांमध्ये वैचारिक प्रगल्भता दिसून येत





डावीकडे : पुस्तकप्रकाशन समारंभात मा. नितीन गडकरी आपले मनोगत व्यक्त करताना.
उजवीकडे : पुस्तकाचे प्रकाशन करताना राजहंस प्रकाशनाच्या नागपूर कार्यालयाचे संचालक नरेश सबजीवाले, सुनील आंबेकर, केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी आणि विवेक घळसासी

नसल्यामुळे खंत व्यक्त केली. आज बहुतेक नेत्यांना संगीत, साहित्य व नाट्यामध्ये रुची नाही. ते वाचन करीत नाहीत. वैचारिक चर्चा करीत नाहीत. त्यामुळे अनेकांची अभिव्यक्ती उथळ व बटबटीत वाटते. असे नेते देशाची जडणघडण करू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. राजहंस प्रकाशनचे संचालक नरेश सबजीवाले यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले तर, आशुतोष अडोणी यांनी सूत्रसंचालन केले.

'माझ्याकरिता राष्ट्रच सर्वोतोपरी असून, ते समृद्ध व्हावे, हीच माझी नेहमी इच्छा असते,' अशी भावना नितीन गडकरी यांनी या वेळी व्यक्त केली. ''माझे जीवन आई, संघ आणि विद्यार्थी परिषदेमुळे घडले. कार्य, कर्तृत्व, जिद्द, चिकाटी, संवेदनशीलता, सहृदयता, समभाव आदी गुण या तिघांमुळेच मिळाले. त्यातून मी देशहिताकरिता उल्लेखनीय कामे करू शकलो. देश व समाजाकरिता काम करण्याची इच्छा असली की काहीच अशक्य राहत नाही. जगात जे काही चांगले आहे, ते सर्व भारतात आले पाहिजे आणि सर्व जण सुखी झाले पाहिजेत, असे मला नेहमी वाटते,'' असे गडकरी यांनी सांगितले. विचारशून्यता ही आज देशाची मोठी समस्या आहे, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

❖

# वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

*राजहंस परिवार अमृतमहोत्सवाकडे वाटचाल करत असताना सुहृदांचे असे काळजातले बोल आम्हांस आनंद देतात. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी दिलेले हे पत्ररूपी आशीर्वाद.*

प्रिय सुहृद
श्री. दिलीप माजगावकर यांना -
प्रेमपूर्वक नमस्कार, (वडिलकीच्या नात्याने आशीर्वादसुद्धा...)

तुम्हांला आज मुद्दाम पत्र लिहावंसं वाटलं, ते तुमची दोन्ही खंडात्मक पुस्तके वाचून. एरवी पत्रं लिहिण्याचा कंटाळा आणि अलीकडील एकामागून एकच्या आजारीपणामुळे आलेला मानसिक विस्कळीतपणा. आज ९५ला टेकलेले, त्यामुळे संध्या-छाया वगैरे. असो. याचा प्रत्यय माझ्या आताच्या अक्षरावरून येईल. तुमची दोन्ही पुस्तके अत्यंत आवडली - ती का ते नेमके सांगता येणार नाही पण त्यांतून तुमचे जवळ जवळ समग्र व्यक्तिमत्त्व वाङ्मयीन, प्रकाशकीय, वक्ता, लेखक, स्नेही आणि व्यक्तिगत हृद्य तपशील यांतून माझ्या-सारख्या तुमच्या सर्व दूरस्थ आणि निकटच्या सुहृदांना दिलीप माजगावकर हे लोभसपणे भेटतात व अशा मित्राचा लोभ आपणांस लाभला, याचा खूप आनंद वाटतो.

मला आठवते, ते मी गोव्यात असताना, खूप वर्षांपूर्वी तुम्ही आणि निर्मलाताई तिकडे आला होता, ती पहिली भेट. त्यानंतर आपल्या फारशा भेटीगाठी झालेल्या आठवत नसल्या तरी, अदृश्यपणे आपली माणसं आपणांस नित्य भेटत असतातच. तशा तुमच्या तत्कालीन 'माणूस'मधून - 'राजहंस'च्या पुस्तकांतून भेटी होतच होत्या. प्रत्यक्षात मात्र भेटलो कमी वेळा, त्यातील एका भेटीचा तुम्ही, मी, गानू असा पाकणीकरांनी काढलेला सुंदर फोटो माझ्या संग्रही आहे.

'राजहंस'चा आलेख तुम्ही अत्यंत सुंदरपणे वाढवला आहे. तुमची बरीचशी पुस्तके माझ्या परिघांतील दोन ग्रंथालयांनी खरेदी केलेली मला उपलब्ध होतात; एक कारूळ या माझ्या कोकणांतील गावातील व दुसरे मालगुंड येथील 'केशवसुत स्मारकांतील ग्रंथालय'. दोन्ही ग्रंथालये उत्तमोत्तम ग्रंथांनी समृद्ध आहेत. उत्तमोत्तममध्ये 'राजहंस'चा क्रम वर असतो, हे मी लिहायला नको. असो.

...२...

तुमच्या दोन्ही पुस्तकांनी तुमच्या भेटीचा साक्षात आनंद दिला. दोन दिवस जणू काही तुमच्या सहवासातच होतो. असा आनंदी अनुभव श्री.पुं.वरील पुस्तकाने दिला होता. परवा 'साधना'मधील तुमच्यावरील प्रशांत दीक्षित यांचा सुरेख लेख वाचला, तेव्हा श्री.पुं.ची तुमच्यावरील मर्जीही पुन्हा माहीत झाली. तुम्ही दोघेही (तुलना नको पण) पृथगात्म व्यक्तिमत्त्वाचे असूनही त्यांत एक समान धर्म मला आढळतो. स्थिरचित्ताने समग्र जगाकडे सहृदयपणे पाहणे, जे जे चांगले त्यावर लोभ करणे, मैत्र सांभाळणे, प्रकाशन व्यवसायाकडे 'व्रत' म्हणून पाहणे व निरपेक्षवृत्तीने पण सजग सापेक्षपणे वागणे. ही गोष्ट कठीण आहे. पण काहींना ती सहज साधते. त्या कांहींपैकी तुम्ही एक. हे लिहिताना मन स्नेहभावाने भरून येते. आनंद वाटतो.

वय व प्रकृती अस्वास्थ्य यामुळे अलीकडे सार्वजनिक वावर कमी केला आहे. परवां पुण्याला जाऊन आलो. तो कार्यक्रम आटोपतांच पुन्हां लगेचच मुंबईला परतलो. पण १५ तारखेनंतर पुण्याला येणार आहे. तिथे डॉ. शिरीष साठे हे cardiologist माझी हृदयतपासणी करतात. त्यांनी appointment दिली आहे. पुण्यात आल्यावर तुम्हांला भेटावे अशी उत्कट इच्छा आहे. बघूं या जमते का.

तुमचा स्नेहांकित

**मधु मंगेश कर्णिक**

**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या व मलपृष्ठाच्या आतील पानांवरील पुस्तकांविषयी**

- कहाणी घरगृहस्थीची — किंमत : ₹ १५०/-
  सरोज देशपांडे
- कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या! — किंमत : ₹ १०००/-
  सुहास बहुळकर

[illegible]

## 'राजहंसी' मोहोर

[illegible]

**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**

**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी वापरा

**'राजहंस ॲप'**

[illegible]

तुम्ही 'राजहंस'ला कधीही भेट द्या

Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ☎ २४४७३४५९/२४४८२४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- [illegible]
- [illegible] मुंबई [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible] नाशिक [illegible]
- [illegible] कोल्हापूर [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible] सोलापूर [illegible]

आयुष्य सजगपणे आणि भरभरून जगताना
मनात आलेले विचार, भावना, कल्पना, घेतलेले निर्णय,
अवतीभोवतीची माणसं, त्यांचं वागणं, वेगवेगळी परिस्थिती या
साऱ्यांचं जाणीवपूर्वक चिंतन करून जे गवसलं त्याचं
अक्षरसंचित म्हणजे ‘कहाणी घरगृहस्थीची’ !
वाचणाऱ्या मनांना लिहिते करणारे हे वेधक पुस्तक जरूर वाचा.....



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post

## ‘भाग १ ते ३’ची

### रौप्यमहोत्सवी आवृत्ती

# बोक्या सातबंडे

दिलीप प्रभावळकर




बालवाचकांच्या पसंतीस उतरलेले बोक्या सातबंडे या
पुस्तक मालिकेचे भाग ४ ते १० देखील उपलब्ध...

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक ‘राजहंस’ प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**